
व्यक्तिमत्व विकास

# स्पर्धा परिक्षांचे अभ्यासतंत्र

## प्रा. संजय मोरे




कवितासागर प्रकाशन

# स्पर्धा परिक्षांचे अभ्यासतंत्र

प्रा. संजय मोरे

कवितासागर प्रकाशन

ई आवृत्ती : ई साहित्य प्रतिष्ठान

ई प्रकाशक :: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

ई प्रकाशन : 14April2016

©esahity Pratishthan® 2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**व्यक्तिमत्व विकास**

# स्पर्धा परीक्षांचे अभ्यासतंत्र

संजय भिकाजी मोरे

कवितासागर प्रकाशन
Jaysingpur - 416101, Taluka - Shirol, District - Kolhapur, Maharashtra, India

# KavitaSagar कवितासागर


- Registered with the **International ISBN Agency, London, UK** and The Government of India, Ministry of Human Resource Development, New Delhi
- Title - **Spardha Parikshanche Abhyastantra**
  (**स्पर्धा परीक्षांचे अभ्यासतंत्र**)


- Author - **Sanjay Bhikaji More** (संजय भिकाजी मोरे)
  संपर्क : **022 - 28334999, 9322350466, 9930625166**


- Year of Publication - **March 08, 2016** (**मार्च 08, 2016**)
- Edition's - **First** (**प्रथम आवृत्ती**)
- Volume - **One** (**खंड पहिला**)
- Price - **Rs. 80 /-** (**मूल्य 80/- रुपये**)
- Subject - **Personility Development** (**व्यक्तिमत्व विकास**)
- Language - **Marathi** (**मराठी**)
- Total **68 Pages** including covers.


- **Copyright** © **Sanjay Bhikaji More** संजय भिकाजी मोरे All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, without the prior permission of the copyright holder. Only the publisher can export this edition from India. Due care has taken to ensure that the information provided in this book is correct. However, the publishers bear no responsibility for any damage resulting from any inadvertent omission or inaccuracy in the book.


- Published in India in **2016** by - **Dr. Sunil Patil (डॉ. सुनील पाटील)**
  On Behalf of **KavitaSagar Publication (कवितासागर प्रकाशन)**
  02322 - 225500, **9975873569**, sunildadapatil@gmail.com, sunil77p@rediffmail.com
- Typesetting by - **Dhudat Desktop Publishing Center**
- Cover Design by - **Shrikant Shinde** (**श्रीकांत शिंदे**)
- Printed and Bound in India by - **KavitaSagar Printing Services**


- **Views expressed** in this book are **entirely** those of the respective **Authors** and do not represent the opinions or thoughts of the **Publisher**

# ॥ अर्पण ॥

**तुम्हीं देव पाहिलात का?**
**तर या प्रश्नाचे उत्तर**
**माझ्यासाठी ‘हो’**
**असेच आहे.**
**साक्षात् परमेश्वर माझे वडील**
**श्री. भिकाजी काशीराम मोरे**
**यांना सविनय अर्पण**

संजय मोरे

स्पर्धा परिक्षेतील यश मिळवून देणारे पुस्तक - **स्पर्धा परीक्षांचे अभ्यासतंत्र**

आजच्या तरूण पिढीमध्ये स्पर्धा परीक्षा हा शब्द माहित नाही असा एकही तरूण आपल्याला भेटणार नाही. अनेकांचे स्वप्न असते सरकारी नोकरी मिळविणे आणि ती मिळविण्यासाठीची जिद्द ही अनेकांच्या मनामध्ये असते परंतु त्यासाठी लागणारे परिश्रम, संयम या गोष्टी अंगभूत असणे आवश्यक आहे. लेखक संजय मोरे यांनी या पुस्तकामध्ये करिअर कसे घडवायचे, वेळेचे नियोजन तसेच करिअरचा मार्ग या गोष्टीं बरोबरच स्पर्धा परीक्षांतील गैरसमज दूर करण्यासाठी सखोल मार्गदर्शन केले आहे.

अनेक विद्यार्थ्यांचे स्वप्न असते की, मोठेपणी आयएएस, आयपीएस अधिकारी व्हायचे परंतु त्यासाठी लागणारी पूर्व तयारी, स्वतःचा अभ्यास त्याच बरोबर शारीरिक आणि मानसिक तयारी असायला हवी आणि सर्वात महत्वाचे म्हणजे अभ्यासात सातत्य असायला हवे. एखादे उत्तम ध्येय गाठायचे असल्यास सकारात्मक विचार ही पहिली पायरी असते. त्यानंतर कृती, सवय आणि परिणाम या समीकरणाशिवाय स्पर्धा परीक्षेमध्ये योग्य त्या ध्येयापर्यंत पोहचता येत नाही. विद्यार्थ्यांनी स्वतःजवळ असलेल्या वेळेचा सदुपयोग केला पाहिजे. असे म्हणतात की, **'समय ही जीवन है, समय को बरबाद करना, अपने जीवन को बरबाद करना है.'** अनेक विद्यार्थी सुट्टीचा काळ हा मौज, मजा, मस्ती किंवा नुसतेच पडून राहून वेळ वाया घालवतात. बारावी ते पदवी पर्यंतच्या सुट्टीच्या काळाचा उपयोग स्पर्धा परीक्षेतील विविध घटकांचा अभ्यास करण्यात घालविला तर पदवी पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना जास्त कष्ट घ्यावे लागणार नाहीत. अतिरिक्त पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील यांचे एक सुंदर वाक्ये येथे आठवते ते म्हणतात, **'शांततेच्या काळात जास्त घाम गाळल्यास, युद्धाच्या काळात जास्त रक्तपात होत नाही'** हे नेहमी लक्षात ठेवा. स्पर्धा परीक्षा जिंकण्यासाठी चिकाटी, जिद्द, एकाग्रता, सातत्य, मेहनत, प्रामाणिकपणा आणि संयम हे गुण आवश्यक आहेत. आज अनेक विद्यार्थ्यांमध्ये संयम हा गुण कमी होत चालल्याचे दिसून येत आहे. आपण जी परीक्षा देवू त्या परीक्षेमध्ये यश

मिळालेच पाहिजे आणि यश नाही मिळाले तर नकारात्मक दृष्टिकोन वाढतो त्याचे रुपांतर नैराश्यामध्ये होते आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये यश प्राप्त करावयाचे असल्यास काही अभ्यासतंत्रे व कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असते त्याच बरोबर अभ्यासाचे नियोजन करता आले पाहिजे. एखादे मोठे ध्येय तुम्हाला गाठायचे असल्यास त्याची विभागणी करून छोटे-छोटे ध्येय प्राप्त करा म्हणजे मोठे यश मिळविणे सोपे होईल. म्हणूनच म्हणतात ना **If You Fail To Plan, You Plan To Fail**. पुढच्या काही वर्षांमध्ये सुखी आणि आनंदी राहायचे असल्यास आता जी वेळ आपल्या हातामध्ये असते त्या वेळेत जास्तीत जास्त कष्ट घेतले पाहिजे.

स्पर्धा परीक्षांची पूर्व तयारी करत असताना त्याचा अभ्यासक्रम लक्षात घेवून करायला हवी. जवळपास सर्वच स्पर्धा परीक्षांमध्ये गणित, इंग्रजी, बुद्धीमत्ता, विज्ञान, चालू घडामोडी हे विषय सम पातळीत असतात. अनेक विद्यार्थ्यांना गणित हा विषय नावडता असतो परंतु लेखक संजय मोरे यांनी स्पर्धा परीक्षांतील गणिताची तयारी या घटकामध्ये सहज समजेल अशा पद्धतीने सांगितले आहे. या घटकाचे वाचन केल्या नंतर विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताची भिती नक्कीच नाहिशी होईल. तसेच मराठी भाषा आपल्या दररोजच्या व्यवहारातील असली तरी सुद्धा व्याकरण, म्हणी, वाक्यप्रचार, वाक्यरचना अशा वेगवेगळया घटकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षांची काठिण्य पातळी गेल्या काही वर्षामध्ये खूपच वाढली आहे त्यामुळे स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करीत असताना लेखक संजय मोरे यांचे पुस्तक एक मार्गदर्शक म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याला स्पर्धा परीक्षेतील यश मिळविण्यास मदत होईल याची मला खात्री वाटते. लेखक संजय मोरे यांना भावी लिखानासाठी मी खूप खूप शुभेच्छा देतो. त्याच बरोबर स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थ्यांना अनमोल असे पुस्तक प्रकाशन करण्याचे काम कवितासागर प्रकाशनचे प्रकाशक डॉ. सुनिल पाटील यांचे ही मी खूप खूप आभार मानतो.

**- मंगेश विठ्ठल कोळी** (लेखक-संपादक-समीक्षक)
रूपा निवास, पुष्पक चित्रमंदिरच्या मागे, गणेशनगर, शिरोळ - 416103, तालुका - शिरोळ, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र, संपर्क : **9028713820**, **mangeshkoli@gmail.com**

# माझं मन सांगतय... अर्थात मनोगत

**'स्पर्धा तिथे प्रगती'** - 'स्पर्धेशिवाय प्रगती नाही' ही वाक्यं आपल्याला माहीतच आहेत. तरीसुद्धा स्पर्धा परीक्षांसाठी काही जणांची अजूनही मानसिकता तयार झालेली नाही असे ब-याच ठिकाणी व्याख्यानाला जात असतांना प्रकर्षाने जाणवले. मग हे उमेदवार स्पर्धेला घाबरतात का? जर घाबरत असतील तर का? असे बरेच प्रश्न माझ्या मनात निर्माण होत होते आणि त्या प्रश्नांची उत्तरे कालांतराने मिळत चालली आहेत. म्हणजेच स्पर्धेला उमेदवार का घाबरतात? याची कारणे मिळायला लागली. या ब-याच कारणांपैकी एक कारण म्हणजे या स्पर्धा परीक्षांबद्दल फार थोडी माहिती असणे, अथवा माहितीच नसणे किंवा स्पर्धा परीक्षांबद्दल गैरसमज असणे. म्हणूनच वर्तमानपत्रात लेखन करीत असतांना (लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ, लोकमत, सामना, तरुण भारत, महाराष्ट्र रोजगार वृत्त, कवितासागर, स्वाभिमान आणि आपलं करिअर) या स्पर्धा परीक्षांची एकत्रित माहिती असणारे व स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासतंत्र, स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध व्हावे हा मनात हेतू ठेवून **'स्पर्धा परीक्षांचे अभ्यासतंत्र'** हे पुस्तक लेखन करण्याचे ठरविले.

'आपलं करिअर' या वर्तमानपत्रात लेखन करीत असतांनाच लेखक व समीक्षक श्री. **मंगेश कोळी** यांचे लेख वाचनात आले. उत्तम लेखन, सध्याच्या युवा पिढीला उपयुक्त असे त्यांचे लेखन असल्याने त्यांच्याशी फोनवर बोलणे सुरु झाले. आणि त्यातूनच कोल्हापूर जिल्ह्यातील जयसिंगपूर येथील **कवितासागर** प्रकाशनाचे **प्रकाशक डॉ. सुनील पाटील** यांच्याशी पुस्तकाच्या संदर्भात बोलणी सुरु झाली. चर्चेत वेळ न घालविता, कामाला प्राधान्य देणे हे प्रकाशक डॉ. सुनील पाटील यांचे काम करण्याचे कसब उत्कृष्ट वाटले, आणि हो खरोखरच लेखकाशी प्रत्यक्ष न भेटता पुस्तक प्रकाशित करण्याचे त्यांनी ठरविले... म्हणजेच

कामाला प्राधान्य देणे हे त्यांचे विचार फक्त बोलण्यासाठी नव्हे तर प्रत्यक्षात आचरणात आणण्यासाठी आहेत याची मला प्रचिती आली.

पुस्तकाच्या लेखांचे टायपिंगचे काम सौ. दर्शना करावडे यांनी उत्कृष्टपणे केले. पुस्तकासाठी माझा विद्यार्थी आणि मित्र श्री. सुदीप कांडरकर यांनीही मोलाची मदत केली. आणि सर्वात महत्वाचे तुम्ही वाचक मला वाटतं की, मी लिहिल्यानंतर हे सर्व विद्यार्थी (ज्यांना आपले भवितव्य उज्ज्वल करायचे आहे.) हे पुस्तक स्वतःच्या, समाजाच्या, देशाच्या प्रगतीसाठी आणि हितासाठी वाचतील म्हणूनच हे पुस्तक लिहावेसे वाटलं. पुस्तक लेखनात घरातील सर्वजण अर्थातच माझी पत्नी सौ. सायली मोरे (संचालिका - करिअर मेकर्स अकॅडमी, मुंबई) जी सतत चांगले काम करण्यास फक्त सांगतच नाही तर प्रोत्साहित करते. तसेच मुलगा अपूर्व (जो सध्या विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करतो आहे तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी करणा-या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतो आहे.) आणि दुसरा मुलगा अथर्व यांनी देखील मला पुस्तक लेखनात मदत केली.

'स्पर्धा परीक्षांचे अभ्यासतंत्र' या व्यक्तिमत्व विकास विषयक पुस्तकास **मंगेश विठ्ठल कोळी** यांनी प्रस्तावना लिहून दिली आणि डॉ. **सुनील दादा पाटील** यांनी तत्परतेने माझ्या इच्छेनुसार **स्पर्धा परीक्षांचे अभ्यासतंत्र** हे पुस्तक प्रकाशात आणले... त्यांचा या कार्याचा व्याप व सततचे परिश्रम याला कारणीभूत असून त्यांना मी शतशः धन्यवाद देतो. तसेच ज्ञात अज्ञातांकडून मिळालेले प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष सहकार्यही तेवढेच मोलाचे समजून त्यांनाही धन्यवाद देतो. या सर्वांचे आभार असे मी म्हणणार नाही तर यांनी केलेल्या सहकार्याच्या ऋणात मी सदैव राहीन, अधिक चांगले लेखन करण्यासाठी, मार्गदर्शन करण्यासाठी आणि सदैव चांगले काम करण्यासाठी. पुस्तकाबद्दल काही सूचना / तक्रारी वाटल्यास जरूर कळवा तुमच्या सूचनांचे नक्कीच स्वागत होईल.

**- संजय मोरे** (9930625166) करिअर मेकर्स अकॅडमी, मुंबई

# अनुक्रमणिका...

१. करीअर घडवा दिवाळीच्या सुट्टीत
२. करिअर योग्य दिशेने
३. टाईमपास आयुष्यात नापास...
४. बारावी ते पदवी परीक्षेनंतरचा सुट्टीचा काळ व करिअरची तयारी
५. राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा
६. स्पर्धा परीक्षा - नोकरीचा राजमार्ग
७. स्पर्धा परीक्षा जिंकण्यासाठी
८. स्पर्धा परीक्षा - अभ्यास आणि कौशल्य
९. स्पर्धा परीक्षा - नियोजन
१०. स्पर्धा परीक्षा - अभ्यास तंत्र व क्षमता
११. स्पर्धा परीक्षांसाठीची भूमिका व पूर्वतयारी
१२. स्पर्धा परीक्षांतील गणिताची तयारी
१३. मराठीचा सराव आणि आत्मविश्वास
१४. लक्ष्य सरकारी नोकरी
१५. रिझर्व बँक ऑफ इंडिया ग्रुप ‘बी’ ऑफिसर पदाची तयारी
१६. स्पर्धा परीक्षा - मानसिकता सक्सेस मंत्र

# करीअर घडवा दिवाळीच्या सुट्टीत



दिवाळीचा सण, आनंदाचा सण आणि महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशातील सर्वात मोठा सण. परीक्षा संपलेली म्हणजेच अभ्यास पूर्ण करून व्यवस्थितपणे परीक्षा दिली आहे आणि आता सुट्टी म्हणजे मजाच मजा. हे सर्व खरे असले तरीही खरी दिवाळी तीच म्हटली जाईल जी आपल्या करिअरला योग्य दिशा मिळेल आणि म्हणूनच खरी दिवाळी साजरी करायची असेल तर दिवाळीच्या सुट्टीचा उपयोग मौजमजेसाठी, आनंदासाठी, खेळण्यासाठी, फिरण्यासाठी करण्याबरोबरच करीअर निवडीसाठी, अभ्यासासाठी करायला हवा. भावी आयुष्य चांगले घडविण्यासाठी प्रत्येक दिवाळीच्या सुट्टीचा काही भाग करिअरसाठी, अभ्यासासाठी द्यायला हवा आणि तेव्हाच होईल ख-या अर्थाने दिवाळी साजरी.

काळ बदलला तसे सुट्टी, त्याचा उपभोग याचे निकषही बदलले आणि या बदलांबरोबरच आपणही बदलायला हवे. दिवाळीची सुट्टी म्हणजे आपणासाठी मिळालेला वेळेचा खजिना. याचा सदुपयोग कसा करायचा याची आखणी करायला हवी आणि हे नियोजनपर कार्य कसे करावे हे सुद्धा ठरवायला हवं. हे नियोजन इयत्तेनुसार तसेच परीक्षांनुसार व व्यक्तीनुसार बदलेल.

स्पर्धेच्या युगात संगणकाचे ज्ञान, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व या आवश्यक गोष्टी बनल्या आहेत. म्हणून या सुट्टीचा उपयोग संगणकाचे ज्ञान मिळविण्यासाठी, इंग्रजी संभाषण कौशल्य अवगत करून घेण्यासाठी तसेच एखाद्या परदेशी भाषेचे ज्ञान (इंग्रजी भाषे व्यतिरिक्त) मिळवायला हवे. व्यक्तिमत्व विकासासाठी एखाद्या शिबिराला जायला हवे अथवा आपले सॉफ्ट स्किल्स (मुलाखतीची तयारी, ग्रुप डिस्कशन, वक्तृत्व कला, संभाषण कौशल्य इत्यादी) वाढवावेत. म्हणजेच स्वतःमध्ये सुधारणा करण्यासाठी अथवा स्पर्धेत अग्रेसर राहण्यासाठी एखादा छंद जोपासावा.

छंद हा जीवनातील विरंगुळा असतो. मनोरंजनासाठी, मनाला विरंगुळा मिळावा म्हणून अनेकजण छंद हौसेने जोपासताना दिसतात. परंतु हा छंद जोपासताना नित्याच्या त्याच-त्याच व्यवहाराच्या चौकटीबाहेर जाऊन काहीतरी वेगळे करावे, त्यातून मनाला आनंद तर मिळेलच पण काहितरी नवनिर्मिती केल्याचे समाधानही मिळेल. छंदाची आवड लहान-मोठ्या सर्वांनाच असते. छंदातून कार्यक्षमता वाढते तसेच छंदातून स्वावलंबन, नवनिर्मिती, व्यवसाय शिक्षणाची आवड उत्पन्न होते. सुख-समाधान मिळते, शिवाय पैसा व कीर्ती ही मिळते

संग्राहक छंदाचे प्रमाण विद्यार्थ्यांमध्ये जास्त दिसून येते. लहान वयात चित्रकला, हस्तकला याचा ही छंद अनेक जणांना असतो. तसेच याच वयात दगड, मनी, शंख-शिंपले, पेन, खोडरबर, विविध देशांच्या ध्वजांची चित्रे, विमानांची चित्रे, विविध देशांचे नकाशे अशा त-हेच्या वस्तु जमवून संग्राहक वृत्ती वाढत असते परंतु आपला संग्रह परिपूर्ण असावा त्यात काहितरी अलौकिक भर पडावी म्हणून सतत प्रयत्नशील रहावे अशा प्रकारे छंदातून वेगळी वाट पाहायला मिळू शकते.

संगणकीय ज्ञानाला आता पर्याय उरला नाही. उलट संगणकाचे ज्ञान नसलेला अज्ञानी असे म्हणण्याची वेळ येऊन ठेपली आहे. आता तर प्रत्येक नोकरीच्या ठिकाणी संगणक ज्ञान ही अत्यावश्यक बाब ठरलेली आहे. बँकेतील नोकरी तसेच सरकारी कार्यालयातही संगणक ज्ञान ही

महत्त्वाची बाब आहे. या ज्ञानामुळे आपण आधुनिक जगात वावरत आहोत याची प्रचीती येते म्हणून या सुट्टीत संगणक ज्ञान वाढविण्यावर भर द्यायला हवा. संगणक ज्ञानाबरोबरच संगणक दुरुस्ती कोर्स, मोबाईल दुरुस्ती कोर्स करायला हरकत नाही. जेणे करून छोट्या-छोट्या संगणक / मोबाईल दुरुस्तीसाठी आपणास इंजिनीअरला बोलविण्याची गरज भासणार नाही. बदलत्या शिक्षण पध्दतीतील बदलते ज्ञान आत्मसात करायला हवे म्हणून या सुट्टीत मोबाईल रिपेअररींग कोर्स करण्यावरही भर द्यायला हवा.

जग फार जवळ येत चालले आहे म्हणजे जग हे एक खेडेगाव वाटावे अशी प्रगती विज्ञान व तंत्रज्ञानाने केलेली आहे आणि या खेडेगावाची बोलीभाषा इंग्रजी आहे अशी परिस्थिती आज निर्माण झाली आहे. मग ही बोलीभाषा आपणास अवगत नसेल तर? तर ....... आपण ब-याच चांगल्या-चांगल्या गोष्टींपासून वंचित राहू शकतो. चांगल्या संधींचा फायदा घेता येणार नाही इतक्या मोठ्या प्रमाणावरील नुकसानापासून वाचायचे असेल तर इंग्रजी भाषा यायलाच हवी. बरेचसे चांगले, दर्जेदार तसेच माहितीपूर्ण साहित्य हे इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे या साहित्याचा आस्वाद घेण्यासाठी, नवनवीन माहिती मिळविण्यासाठी ही भाषा यायलाच हवी.

आपल्या जीवनाचे ध्येय ठरविण्यासाठी तसेच ठरविलेले उद्दिष्ट गाठण्यासाठी गरज असते त्यासाठी आत्मविश्वासाची, नियोजनाची, चिकाटीची, कठोर परिश्रमाबरोबरच सकारात्मक विचारांची आणि या सर्व गोष्टी जाणून घेण्यासाठी शिष्टाचार, शिस्त याची योग्य ओळख करून घेण्याचीही गरज आहे आणि त्यासाठी या सुट्टीत व्यक्तिमत्व विकास, स्मरणशक्ती वाढविणे अशा शिबिरातून मार्गदर्शन घ्यायला हवे. या शिबिरातून नेतृत्व गुण, वक्तृत्व कला, वेळेचे नियोजन या बाबींचे महत्त्व कळते. टिम वर्क, ध्येयनिश्चिती या आणि अशा विविध गोष्टींमुळे सकारात्मक वृत्ती वाढते, आत्मविश्वास दुणावतो. तुम्ही ज्या क्षेत्रात

चांगले आहात त्याला विकसित करा, स्वतःला स्वतःमध्ये बघा, जे दिसेल त्याचे वर्गीकरण करा. स्वतःमध्ये दोष असणे काही गुन्हा नाही मात्र त्यात सुधारणा न करता तो झाकून / लपवून ठेवणे ही विकृती आहे हे लक्षात घेऊन सुधारणेवर भर द्या.

या सुट्टीचा आणखी एक सर्वात चांगला उपयोग करून घेता येईल तो म्हणजे स्वतःसाठी वेळ काढणे, स्वतःला ओळखणे. SWOT (S- Strength, W - Weakness, O- Opportunity, T - Threat) ॲनॅलिसिसचा बारकाईने विचार व्हायला हवा. स्वतःमधले दोष ओळखून ते दूर करण्याचा प्रयत्न करा. नव्या संकल्पनांचा शोध घ्यायला हवा.  विचार चांगले व्हायला हवेत तसेच ते अंमलात आणण्याचा प्रयत्न करायला हवा. आपल्याला कोण व्हायच आहे?  आपण त्या दृष्टीने कसे प्रयत्न करीत आहोत?  आपल्याजवळ काय आहे?  याचा शोध घ्यायला हवा. वेळ मिळत नाही हे खरं नसून मिळालेल्या वेळेत नेमके कशाला महत्त्व द्यावे हे समजायला हवे. तसेच ते समजून घेतले पाहिजे. गेलेल्या क्षणापेक्षा पुढचा क्षण वेगळा असण्यासाठी प्रयत्न करायला हवा. नुसता वेगळा नव्हे तर तो क्षण चांगला असण्यासाठी सतत कार्यमग्न राहायला हवे. आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी आपला दर्जा, वेळ, गुणवत्ता, वेग, किंमत अशा प्रभावी घटकांचा विचार करायला हवा. तसेच आचारही हवा, आत्मपरीक्षणाची गरज हवी.

डोळे उघडे ठेवले तर जीवन विद्यालय बनते ज्याला शिकायची भूक आहे, तो प्रत्येक घटनेतून शिकतो. प्रत्येक व्यक्तीपासून शिकता येते. कसे शिकायचे, ज्याला समजले त्याला ज्ञान प्राप्त होते. अशी व्यक्ती जीवनात सर्वकाही शिकू शकते. शिक्षण ही प्रक्रिया सदा सर्वकाळ सुरु असते.  हे ज्याला समजले त्याला शिकण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. डोळे, कान उघडे ठेवले तर शिक्षण संपतच नाही. तर मग घडवा करिअर या सुट्टीत.

# करिअर योग्य दिशेने




येणा-या नवीन वर्षांत जवळपास सर्वच जण सरत्या वर्षात कोणता तरी संकल्प धरतात व तो संकल्प नवीन वर्षात पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. तर मग नोकरीच्या शोधात असणा-या उमेदवारांनाही या येणा-या नवीन वर्षात उत्तम करिअर करू अथवा उत्तम नोकरी मिळवू असाच संकल्प करायला हवा आणि या येणा-या नवीन वर्षात योग्य दिशेने करिअरची वाटचाल करायला हवी. एखादे ध्येय समोर ठेवून त्या दिशेने वाटचाल व्हायला हवी. बघता बघता वर्ष संपते, या संपलेल्या वर्षी आपण काय करू शकलो का? जे ध्येय वर्षभरात ठरविले होते ते साध्य झाले का? याचे सिंहावलोकन करायला हवे. आपण ठरविलेले ध्येय साध्य करता आले नसेल तरीही खचून जाऊ नका. येणा-या नवीन वर्षात भरपूर संधी येतील त्यांचा फायदा घ्या व आपल्या करिअरची वाटचाल योग्य दिशेने करा. समजा गत वर्षात आपण एखादे ध्येय समोर ठेवून वाटचाल केली नसेल तरीसुद्धा या नवीन वर्षात काहीतरी ध्येय किमान एक वर्षासाठी ठरवा आणि वाटचालीस सुरुवात करा.

वर्षभरात ब-याच चांगल्या गोष्टींबरोबर वाईट गोष्टीही घडत असतात. कोणतेही वर्ष हे चांगल्या वाईट घटनांनी भरलेले असते. परंतु स्पर्धा परीक्षांची तयारी करणा-या उमेदवारांनी प्रथम ध्येय निश्चित करा आणि त्याचबरोबर देशासाठी काय करता येईल याचा विचार करून त्याप्रमाणे प्रयत्न करायला सुरुवात करावी. आपली प्रगती झाली नाही तर देशाची

प्रगती कशी करता येईल? एकदा का तुम्ही निर्धार पक्का केलात आणि त्या दिशेने प्रयत्नांची सुरुवात केलीत की, आपल्या पंखाना बळ मिळते ते भरारी घेण्यासाठी.

गेल्या वर्षात बँकिंग परीक्षेमध्ये अमुलाग्र बदल झाला. शैक्षणिक पात्रता दहावी (६०%) ऐवजी पदवीधर अशी करण्यात आली. संगणकाचेच युग आहे हे निश्चितपणे पक्के झाले. परीक्षापद्धतीही ऑनलाइन झाल्याने, एमपीएससी पूर्वपरीक्षेमध्ये युपीएससी परीक्षेसारखाच अभ्यासक्रम आणून आयोगाने एक पाऊल पुढेच टाकले आहे.

बँक, रेल्वे, प्रॉव्हीडंट फंड, युपीएससी, एमपीएससी, स्टाफ सिलेक्शन कमिशनद्वारे होणा-या भरती तसेच विविध पदांसाठी विविध खात्यांमार्फत निघणारे विविध अर्ज या सर्व बाबींवर लक्ष ठेवून असायला हवे. हे परीक्षेचे अर्ज निघाल्यावर परीक्षेची तयारी करणे हे नैराश्य पदरात पाडण्यासारखे आहे. स्पर्धा परीक्षेची सतत तयारी सुरु ठेवायला हवी. या परीक्षांचे अर्ज निघण्यापूर्वीच तुम्ही तुमचे फाउंडेशन पक्के करायला हवे आणि त्यानंतरचा चांगला परिणाम तुम्ही अनुभवालच. या येणा-या नवीन वर्षात कोणकोणत्या नवीन पदांसाठी अर्ज निघणार आहेत याची अंदाजित माहिती आपणास घ्यायला हवी. त्यामुळे येणा-या वर्षात आपणास कोणत्या परीक्षेची तयारी करायला हवी ते आत्तापासून ठरविता येईल व आपले ठरविलेले ध्येय साध्य करता येईल. या नवीन वर्षात तुमच्या करिअरला चांगली दिशा मिळो अशी प्रार्थना. तसेच मागील निकालाचा मागोवा घेऊन तुम्हाला जाणवलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी बळ मिळो. तुम्हीसुद्धा ज्या चुका यावर्षी केल्या असतील त्या सुधारण्यासाठी प्रयत्न करा तसेच चांगल्या गोष्टींची पुनरावृत्ती करा. पुढच्या परीक्षेसाठी जोमाने तयारीला लागा आणि या तयारीसाठी तसेच मार्गदर्शनासाठी '**कवितासागर**' आहेच तुमच्या मदतीला. कोणत्या परीक्षेची तयारी करायला हवी ते आत्तापासून ठरवायला हवे व आपले ठरविलेले ध्येय साध्य करायला हवे.

# टाईमपास आयुष्यात नापास...

यश म्हणजे प्रवासातील अंतिम ठिकाण नसून यश म्हणजेच प्रवास आहे. यश मिळवण्यासाठी रोज जिंकण्याची फक्त स्वप्न पाहणे आवश्यक नसतं तर दररोज एखाद्या विजेत्यासारखे विचार आवश्यक असतात. म्हणजेच यशाचा सतत विचार ही यशाची पहिली पायरी आहे... असं म्हणायला काहीच हरकत नाही. ज्या व्यक्ती सतत आपल्या ध्येयपूर्तीचा आणि यशाचा विचार करतात त्याच यशस्वी होतात.

अशा यशस्वी व्यक्तीच प्रतिकूल परिस्थितीतही न डगमगता आव्हानांचा सामना समर्थपणे करू शकतात. या व्यक्ती हे यश अंतिम यश न मानता पुन्हा मार्गक्रमण करीत राहतात. कारण यश हा एक प्रवास आहे आणि या प्रवासाचा आनंद लुटत यशाचे टप्पे ओलांडत पुढे जाण्याचे महत्त्व त्यांना पटलेले असते.

या यशस्वी व्यक्ती कायम विजेत्याच्या भूमिकेत वावरत असल्यामुळे त्याच्या आसपासची परिस्थिती आपोआपच त्यांच्यासाठी अनुकूल होत जाते. या व्यक्ती सकारात्मक भूमिका ठेवून आनंदी वातावरणाचा विचार करतात तेव्हा आजूबाजूचे सर्व लोक आणि परिस्थितीतही सकारात्मक होते. म्हणजेच यशस्वी होणे अथवा अयशस्वी होणे हे सर्वस्वी आपणावर अवलंबून आहे एवढे नक्की! या दोन पर्यायांपैकी कोणता पर्याय आपण स्वीकारायचा हे प्रत्येकाने ज्याने त्यांचे ठरवायचे असते. सकारात्मक विचारांची गुरुकिल्ली ही आपल्या विचारात आहे. कोणत्याही परिस्थितीत चांगली बाजू पाहण्याची शक्ती म्हणजेच सकारात्मक विचारसरणी, आणि अशी सकारात्मक वृत्ती ज्याच्या अंगी आहे, तेच यशस्वी होतात. म्हणूनच म्हटले आहे की, ‘success lies in person’s determination’

यशाच्या दिशेने सकारात्मक विचार ही पहिली पायरी चढल्यावर विचार कृती-सवय आणि परिणाम यांचा सहसंबंध तुमच्या लक्षात येईल. चांगला विचार करून त्याप्रमाणे कृती केली, त्या चांगल्या कृतीची नेहमी सवय ठेवली तर नक्कीच चांगला परिणाम दिसेल. यातील दुसरी पायरी म्हणजे कृती करताना वेळेचे महत्त्व तुमच्या लक्षात येईल.

वेळेचे व्यवस्थापन हे यशस्वी होण्याच्या मार्गावरील उत्तम कसब आहे. वेळेचे व्यवस्थापन योग्य रीतीने अंगिकारले तर तुम्ही तुमचा ताण कमी करून आणखी उत्पादनक्षम व्हाल. त्याचबरोबर तुम्ही तुमच्या आदर्शाचा दबदबा निर्माण करू शकाल आणि ध्येय गाठण्यासाठी तुम्हाला मदत होईल.

यशाची व्याख्या वेगवेगळया लोकांसाठी वेगवेगळी आहे. म्हणजेच एखाद्या शिक्षकाला आपले विद्यार्थी चांगले गुण मिळवत आहेत हे पाहण्यात यश दिसेल, तर एखाद्या व्यवसायिकाला व्यवसायातील स्पर्धेत अग्रेसर राहण्यात यश दिसेल आणि एखाद्या कलाकारासाठी यशाची व्याख्या आणखी वेगळी असेल.

विचार - कृती - सवय - परिणाम या समीकरणाचा विचार करताना चांगली कृती झाली आणि त्या कृतीत सातत्य असेल तर चांगल्या कृतीचे चांगल्या सवयीत रुपांतर होईल. याचे परिणामदेखील मनाजोगे म्हणजे चांगले दिसतील आणि या संगमालाच यश म्हणता येईल.

चांगल्या कृतीत सातत्य राखल्यास साहजिकच त्याचे रुपांतर चांगल्या सवयीत होईल आणि या सवयी वेळेनुसारच असतात. म्हणूनच वेळेच व्यवस्थापन योग्य प्रकारे व्हायला हवे या चांगल्या सवयीतूनच यशोशिखरावर जाण्याचा राजमार्ग मिळणार आहे आणि हे ही लक्षात ठेवायला हवे, की यश हे काही काळापुरतेच मर्यादित असते. यशस्वी राहण्यासाठी तुम्ही सतत क्रियाशील राहायला हवे कारण यश हे सतत

गतिशील असते. यश मूलतः ध्येय, एकाग्रता, मेहनत, चिकाटी, निश्चय, समर्पण व नियोजन या गोष्टींवर अवलंबून आहे.

जो आपणास मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करतो तो यशस्वी होतो आणि ज्याला हे जमत नाही ते अपयशी ठरतात. हे साधं समीकरण आहे. म्हणूनच म्हणतात ना,

**समय ही जीवन है,**
**समय को बरबाद करना,**
**अपने जीवन को बरबाद करना है|**

कोणीही आजचा वेळ उद्यासाठी वाचवून ठेवू शकत नाही. फक्त त्या वेळेचा तो योग्य प्रकारे उपयोग करू शकतो. लक्षात घ्या, आपल्या वेळेला आपल्यापेक्षा कोणीही योग्य प्रकारे वापरू शकत नाही. काहीजण वेळेच बंधन पाळून आपले जीवनमान उंचावतात, तर काहीजण वेळेचे गुलाम होऊन बसतात. म्हणजे माझी वेळ आज खराब आहे, असे मानून पळवाट काढतात.

त्यामुळे वेळेला आपला शत्रु मानण्यात अर्थ नाही. वेळ ही आपल्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाची बाब असून आपल्या प्रगतीसाठी तसेच उन्नतीसाठी ती फार महत्त्वाची भूमिका बजावते. काही वेळा तर वेळ हीच सर्वस्व बनवून जाते. वेळ फक्त त्यांचाच मान राखते जे वेळेचा मान राखतात. फक्त तिचा वापर कसा करायचा याचे ज्ञान व्हायला हवे, तरच आपण जास्तीत जास्त गोष्टी जलद मिळवू शकतो.

वेळेचा योग्य वापर ही बाबच ब-याच जणांसाठी एक समस्या बनलेली असते. यासाठी वेळेचे व्यवस्थापन हाच एक योग्य उपाय आहे.

पण काहीजण इथे ही पळवाट काढतात. त्यासाठी त्यांच्याकडे वेगवेगळ्या सबबीही असतात. म्हणजे व्यवस्थापन ही एक साधी गोष्ट आहे. त्यासाठी वेगळे प्रयत्न करायला कशाला हवेत? दबावाखाली असलो की मी व्यवस्थित काम करतो, मग मी वेळेच व्यवस्थापन कशाला

करू. मला तर वेळेच व्यवस्थापन करण्यासाठी जरा ही वेळ नाही? परंतु सत्य हे आहे की वेळेच व्यवस्थापन करिअरसाठी एक गुरुकिल्ली आहे.

वेळेचे योग्य नियोजन केले तर काम भरपूर आहे, परंतु वेळ मिळत नाही हे म्हणण्याची वेळ येणार नाही. जर तुम्ही यापूर्वी कधीही वेळेच व्यवस्थापन केले नसेल तर तशी आखणी करण्यास थोडा वेळ आहे. परंतु एकदा तुम्ही हे योग्य प्रकारे करू शकलात तर तुम्ही निश्चितच तुमच्या ध्येयाकडे जलद पोहचण्यास मदत होईल.

जवळपास १०० वर्षांहून अधिक काळापासून वेळेचे व्यवस्थापन ही कल्पना अस्तित्त्वात आहे. वेळेचे योग्य व्यवस्थापन करने ही कला आहे आणि सवयीने ती प्रत्येकाला अवगत होऊ शकते. आईन्स्टाईनने वेळेबाबत म्हटले आहे, **मला एखाद काम करण्यासाठी एक तास दिला तर ते काम कसे करायचे या नियोजनासाठी मी ५० मिनिट वापरीन.**

वेळेच्या व्यवस्थापनाबाबत लोकांच्या काही समस्या आणि उपाय.

- कामाच्या अतिताणामुळे आता काहीही करण्याची इच्छा नाही. अग्रक्रम ठरवा. आळस झटकून लवकर कामाला सुरुवात करा.
- चालढकल, दिरंगाई, असबंध, बाबींवर वेळ खर्च करने. चालढकल, दिरंगाई ही बाब म्हणजे वेळ चोरणारी आहे. गुंतागुंतीच्या कामाची योग्य अशा लहान भागांमध्ये विभागणी करा. प्रत्येक भागासाठी ठराविक वेळमर्यादा आखून त्याप्रमाणे काम करा. प्रथम न आवडणारी कामे हाता वेगळी करा. कार्य नियोजन आणि अग्रक्रम ठरवून त्याप्रमाणे काम करण्यासाठी बंधन निश्चित करा.
- कामाची व्याप्ती पाहून ते काम जमेल की नाही अथवा पूर्ण करू की नाही? या शंकेपोटी कामाला सुरुवातच न करने Well

**began is half done.** हे लक्षात घेऊन कामाला सुरुवात करा. मोठ्या कामाची छोट्या कामांमध्ये विभागणी करा.

- आपली उर्जा, क्षमता आणि एकाग्रता तपासून घ्या. ठराविक कामानंतर विश्रांती घ्या. उदाहरणार्थ - एका तासाच्या कामानंतर साधारणपणे ५ मिनिटे विश्रांती घ्या.
- काम चांगले होईल की नाही या भीतीपोटी कामालाच सुरुवात न करणे. परफेक्ट कामाची प्रत्येक वेळी प्रतीक्षा न करता कामाला सुरुवात करा. वेळेचा योग्य वापर केला तर प्रत्येक वेळ ही सर्वात अमूल्य बाब आहे. हे आपल्या लक्षात येईल.



# बारावी ते पदवी परीक्षेनंतरचा सुट्टीचा काळ व करिअरची तयारी

**"स्पर्धा तिथे प्रगती"** - 'स्पर्धेशिवाय प्रगती नाही' हे सत्य नाकारून चालणार नाही. स्पर्धापरीक्षा हा आता प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनलेला आहे. स्पर्धा परीक्षेमुळे बँकाना, कंपन्याना तसेच सरकारी कार्यालयातही अभ्यासू व चांगले उमेदवार निवडता येतात, तर उमेदवारांनाही चांगली नोकरी मिळविण्यासाठी मदत होते. डॉक्टर व्हायचे असेल, इंजिनिअर व्हायचे असेल, मॅनेजमेंटच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायचा असेल अथवा परदेशात जाऊन शिक्षण घ्यायचे असेल, तर स्पर्धा परीक्षा द्यावीच लागते. यावरून स्पर्धा परीक्षेचे महत्त्व आपल्याला लक्षात येईल.

स्पर्धा परीक्षांची तयारी करणा-या उमेदवारांसाठी नोकरीच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत आणि त्या संधीचा लाभ नक्की घेता आला पाहिजे म्हणून त्यासाठी पूर्वतयारी गरजेची आहे. आता हेच पाहा ना दहावी उत्तीर्णांसाठी मुंबई महापालिकेत लिपिक पदासाठी अर्ज मागविण्यात येतात आणि पोस्ट ऑफिसमध्ये बारावी उत्तीर्णांसाठी पोस्टल असिस्टंट या पदासाठी अर्ज मागविण्यात येतात, तसेच दरवर्षी स्टाफ सिलेक्शन मार्फत कंबाईंड हायर सेकंडरी लेव्हल या परीक्षेंतर्गत बारावी उत्तीर्णांसाठी केंद्रशासनात नोकरीची संधी उपलब्ध होते. या परीक्षेद्वारे इन्कम टॅक्स / कस्टम / एक्साईज तसेच केंद्रशासनातील विविध खात्यांमध्ये लिपिक पदासाठी उमेदवार निवडला जातो याशिवाय दहावी उत्तीर्णांसाठीसुद्धा केंद्रशासनात मल्टी टास्किंग स्टाफ या पदासाठी स्टाफ सिलेक्शन मार्फत भरती प्रक्रियेसाठी परीक्षा घेतली जाते.

तसेच आता सर्वात जास्त वेग विस्तारणारे क्षेत्र म्हणजेच बँकिंग क्षेत्र. या बँकिंग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर भरती अपेक्षित आहे. बँकिंग क्षेत्रात नोकरी मिळवण्यासाठी राष्ट्रीयकृत बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, रिझर्व बँक ऑफ इंडिया, नाबार्ड, को ऑप बँक व खासगी बँका असे विभाजन करता येईल. राष्ट्रीयकृत बँकेत ऑफिसर व लिपिक पदासाठी एक सामायिक लेखी परीक्षा आयबीपीएस मार्फत घेण्यात येते. साधारणपणे जुलै- ऑगस्ट मध्ये परीक्षेसाठी अर्ज मागविण्यात आले व त्यानंतर दिड-दोन महिन्यात परीक्षा होते. आता या परीक्षा ऑनलाईन असल्याने ऑनलाईन परीक्षेचा सराव देखील आवश्यक आहे.

याशिवाय शामराव विठ्ठल को-ऑपरेटिव्ह बँक, फेडरल बँक, ओरिएन्टल इन्शोरन्स, नॅशनल इन्शोरन्स, न्यू इंडिया इन्शोरन्समध्ये अधिकारी तसेच लिपिक पदासाठी अर्ज मागविण्यात येतात आणि कंबाईंड हायर सेकंडरी लेव्हल परीक्षा, कंबाईंड ग्रॅज्युएट लेव्हल परीक्षा, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, संघ लोकसेवा आयोग, आरबीआय, एसबीआय, आयबीपीएस मार्फत विविध पदांसाठी अर्ज मागविण्यात येतील तसेच एलआयसीमध्ये अप्रेंटिस डेव्हलपमेंट ऑफिसर पदासाठी अर्ज मागविले जातात. जवळपास सर्वच स्पर्धा परीक्षांसाठीचा अभ्यासक्रम ७५ ते ८० टक्के सारखाच असतो म्हणूनच अभ्यासाची कास सोडू नका. हा अभ्यासच आपल्याला नोकरी / करिअरची संधी उपलब्ध करून देतो.

बारावी परीक्षेनंतर अथवा तेरावी, चौदावी, पंधरावी या परीक्षांनंतरचा सुट्टीचा काळ म्हणजे तुमच्या करिअरला योग्य दिशा देणारी सुट्टी म्हणायला हरकत नाही, म्हणून या सुट्टीचा पुरेपुर उपयोग करून स्पर्धा परीक्षेची तयारी करायला हवी.

अमृतेश औरंगाबादकर या विद्यार्थ्याचे नाव तुम्ही ऐकलेच असेल, अवघ्या २१ व्या वर्षी तो युपीएससी मधील आयएएसची परीक्षा उत्तीर्ण झाला. आणखी बरीच उदाहरणे देता येतील परंतु त्यातील आणखी एक मी जवळून पाहिलेले उदा. म्हणजे युगंधरा आंब्रे. तिने बारावीपासूनच

स्पर्धा परीक्षांचा अभ्यास चालू ठेवला आणि पदवी परीक्षेनंतर लगेचच आलेली बँकेची परीक्षा सहजपणे उत्तीर्ण झाली, म्हणजेच हे यशस्वी होतात तेव्हा त्यांनी आपल्याला मिळालेल्या सुट्टीचा, वेळेचा सदुपयोग आपले करिअर घडविण्यासाठी केलेला आहे. जर आपण देखील आपल्याकडील वेळेचा, आपल्याला मिळणा-या सुट्टीचा योग्य वापर करिअर घडविण्यासाठी केला तर निश्चितपणे स्पर्धा परीक्षेतून चांगले यश मिळविणे अवघड होणार नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पीएसआय / एसटीआय आणि असिस्टंट पदासाठी तसेच लिपिक-टंकलेखक पदासाठी जाहिरात जवळपास दरवर्षी प्रसिद्ध होत असते तसेच वर उल्लेखिलेल्या परीक्षा यावर्षी होणारच म्हणून वेळेचा सदुपयोग अभ्यास करून करायला हवा.

नोकरीच्या या संधी गमावू नका आणि मुंबई पोलीस दलातील धडाडीचे व अग्रणीचे नाव असलेले व अगदी सर्वांसाठी रोल मॉडेल म्हणून नाव घ्यावे असे अतिरिक्त पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांचे वाक्य “शांततेच्या काळात घाम गाळल्यास युद्धाच्या काळात जास्त रक्तपात होत नाही.” हे लक्षात ठेवा. शांततेच्या काळात म्हणजे बारावी, तेरावी ......पदवी परीक्षेनंतरचा सुट्टीच्या काळात योग्य पद्धतीने अभ्यास केल्यास युद्धाच्या काळात म्हणजेच परीक्षेच्या काळात अपयश हा शब्द पदरी पडणार नाही.

तर मग लागा स्पर्धा परीक्षेच्या तयारीला. इंग्रजी व्याकरण, गणितातील सराव (१ ते ३० पर्यंतचे वर्ग व घन, गणितातील ट्रिक्स) टेस्ट ऑफ रिझनिंग मधील वेगळया प्रकारची उदाहरणे आणि जनरल नॉलेजसाठी रोजच्या वर्तमानपत्राचे वाचन व त्यातील महत्त्वाच्या गोष्टींच्या नोंदी या सर्व बाबी व्हायला हव्यात. २५-३० गणितांची उदाहरणे, एखादी सराव परीक्षा हा नित्यनियम असायला हवा तरच भविष्यात येणा-या या विविध नोक-यांमधील यशस्वीतांच्या यादीत तुमचे नाव असणार आहे. तर मग लागा अभ्यासाला आणि सुट्टीचा सदुपयोग करा.

# राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा

राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा ही राष्ट्रीय पातळीवरील शालेय विद्यार्थ्यांसाठी एक मानाची परीक्षा असते. शालेय जीवनातील सर्व स्पर्धा परीक्षांमध्ये उच्चस्तरीय म्हणजेच राष्ट्रीय पातळीवरील सर्वात तीव्र स्पर्धा असणारी तसेच शालेय जीवनात अशा परीक्षेला एकदाच मिळणारी ही एक सर्वसमावेशक अभ्यासक्रम असणारी एकमेव परीक्षा आहे. परंतु महाराष्ट्रात आजही शालेय परिक्षांना या परीक्षेपेक्षा जास्त महत्त्व दिले जाते व नंतर बारावीला आयआयटी, एआयईईई या परीक्षांत महाराष्ट्रातील कमी विद्यार्थी गुणवत्ता यादीत आहेत म्हणून आरडा-ओरडा करतात.

स्पर्धा परीक्षेपासून दूर पळून चालणार नाही हे विसरू नका. विद्यार्थ्यांना शालेय जीवनात आपल्या स्वतःच्या करिअरबद्दल व्यवस्थितपणे मार्गदर्शन करणे, शिक्षकांबरोबरच पालकांचे देखील कर्तव्य आहे. परंतु पालकच जर असे म्हणत असतील की नको आता ही परीक्षा, दहावी झाल्यावर पाहू, तर कसे होणार योग्य करिअर? शालेय जीवनापासून त्यांना स्पर्धा परीक्षांची जाणीव व्हायला हवी व ही जाणीव करून देणे ही पालक व शिक्षक दोघांचीही जबाबदारी आहे.

गेल्या वर्षापासून ही परीक्षा दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात यायला सुरुवात झाली आहे. ही लेखी परीक्षा दोन स्तरांवर घेतली जाते. या परीक्षेत यशस्वी होणा-या विद्यार्थ्यांनाच दुस-या स्तरावरील म्हणजे राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेस बसता येते. ही परीक्षा मे महिन्यात होते. त्यातील यशस्वी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरविण्यात येतात. ही शिष्यवृत्ती अगदी पीएच. डी. (४ वर्षापर्यंत करत असेपर्यत मिळते.)

पूर्वी ही परीक्षा दहावीसाठी होत होती, त्यानंतर ती आठवीसाठी घेण्यात आली व आता गेल्या वर्षापासून आठवीसाठी होणारी परीक्षा रद्द करून

पुन्हा दहावीला करण्यात आली आहे. गेल्या वर्षी या परीक्षेसाठी कमी विद्यार्थी बसले होते.

कदाचित दहावीच्या विद्यार्थ्यांच्या पालकाचा दृष्टीकोन असा असेल की, यंदा दहावीचे वर्ष म्हणजे बोर्डाची परीक्षा तर हाच अभ्यास त्याला नीट करू दे. बोर्डाच्या परीक्षेवर इतर परीक्षांमुळे वाईट तर परिणाम होणार नाही ना? या उलट स्पर्धा परीक्षांमुळे बोर्डाच्या परीक्षेचा अभ्यास फार आधीच पूर्ण होतो व बोर्डाच्या परीक्षेत मिळणा-या टक्केवारीत नक्की वाढ होते, तसेच अभ्यासाची गोडी निर्माण होऊन राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेतील बुद्धिमापन चाचणी या विषयाच्या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांची विचारक्षमता अधिक वाढते.

या परीक्षेचा मूळ उद्देश्य म्हणजे भारतातील प्रज्ञावंत विद्यार्थी शोधून त्यांना त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीत मदत करणे हा होय.

**परीक्षेचा अभ्यासक्रम व तयारी :-**

शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी) यांच्या वतीने घेण्यात येणारी ही परीक्षा राज्य स्तर व राष्ट्रीय स्तर अशा दोन स्तरांसाठी असते. या दोन्ही स्तरांसाठी अभ्यासक्रम सारखाच आहे. परंतु राज्यस्तरीय परीक्षेत त्या त्या राज्याच्या बोर्डाच्या अभ्यासक्रमावर आधारीत प्रश्न विचारले जातात. तर राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत सीबीएसई व आयसीएसई या अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न विचारले जातात.

एकूण तीन प्रश्नपुस्तिका या परीक्षेसाठी असून एकूण १८० गुणांची ही परीक्षा असते.

१) सामान्य बौद्धिक क्षमता चाचणी (General Mental Ability Test)

२) शालेय विषय भाषा चाचणी (Language Testing)

३) शालेय क्षमता चाचणी (Scholastic Aptitude Test)

**सामान्य बौद्धिक क्षमता चाचणी -** ही मानसशास्त्रीय चाचणी असून त्यामध्ये कार्यकारण, भावविश्लेषण, संकलन इत्यादी संकल्पनांवर आधारीत ५० बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न असतात.

**भाषा चाचणी (मराठी/इंग्रजी) -** भाषाविषयक ४० वस्तुनिष्ठ प्रश्न असतात.

**शालेय क्षमता चाचणी -** ही चाचणी सामान्यत: १० वी च्या अभ्यासक्रमांवर आधारीत असते. त्यामध्ये १) सामान्य विज्ञान २) समाजशास्त्र ३) गणित व भूमिती असे तीन विषय असतील. या तीन विषयांचे एकूण ९० प्रश्न सोडवायचे असतात.

प्रश्नपत्रिका मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराती, उर्दू, सिंधी, कन्नड व तेलगु या आठ माध्यमातून उपलब्ध असतात. यापैकी कोणतेही एकच माध्यम घेता येईल. सेमी इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना मूळ माध्यमाऐवजी विज्ञान-गणित विषयांसाठी इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका देण्यात येते.

राज्यस्तरीय परीक्षा ही नोव्हेंबर महिन्यात होते व त्यातून उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांना मे महिन्यात राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेस बसता येते. अशाप्रकारचा या परीक्षेचा अभ्यासक्रम असून ही परीक्षा म्हणजे पुढील स्पर्धा परीक्षांसाठी म्हणजेच आयआयटी जेईई, जीआरई, जीमॅट, युपीएससी, एमपीएससी, स्टाफ सिलेक्शन कमिशन, रेल्वे, बँकिंग यांची एक रंगीत तालीमच आहे. ही परीक्षा आत्तापर्यंत शालेय जीवनात आपण वेगवेगळया परीक्षा देत असल्याचे फलित आहे. म्हणजेच काय तर ही वाटचालच मुळी सुरु होते ती चौथी स्कॉलरशीप, गणित संबोध, प्राविण्य, प्रज्ञा, प्रभुत्व, सहावीला होमी भाभा परीक्षा, पुन्हा सातवीला स्कॉलरशीप, आठवी व नववीला महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा, या व अशा परीक्षांतून विद्यार्थ्यांना आपण स्पर्धेत कोठवर आहोत हे तपासता येते.

म्हणूनच शालेय जीवनातील या सर्व स्पर्धा परिक्षांना आणि आत्ता दहावीतील या राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेला फार महत्व आहे.

राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेचा अभ्यास करताना रोज काही वेळ ठरवून त्या वेळेत हा अभ्यास करावा. तसेच ही परीक्षा राष्ट्रीय स्तरावर असल्याने स्पर्धा फार मोठी आहे तसेच अभ्यासक्रमाची व्याप्ती देखील फार विस्तृत आहे तरीसुद्धा स्पर्धा जिंकायचीच या उद्देश्याने अभ्यासाला लागायचे व तशी तयारी करायची.  या अभ्यासाचा आपणास कायम उपयोग होणार आहे हे विसरून चालणार नाही म्हणून एकाग्रतेने मनःपुर्वक अभ्यास करा.

यशस्वी विद्यार्थ्यांना फार जवळून बरीच वर्ष पाहत असल्याने तसेच त्यांचा अभ्यास घेताना लक्षात येते म्हणून येथे असे नमूद करतो की, बुद्धिवान परंतु आळशी विद्यार्थी यश मिळवितातच असे नाही. म्हणून बुद्धिमत्तेला जोड हवी मेहनतीची, अभ्यासातील सातत्याची, चिकाटीची आणि जिद्दीची. तर मग लागा अभ्यासाला मानाची शिष्यवृत्ती मिळविण्यासाठी.



# स्पर्धा परीक्षा - नोकरीचा राजमार्ग

करिअर, महत्वाकांक्षा, प्रोफेशन हे शब्द सर्वांनाच परिचित आहेत. एम. बी. ए, एम. फिल, एम. ए, एल. एल. बी. असा अभ्यासक्रम करावा, की स्पर्धा परीक्षेची तयारी करावी अशा संभ्रमात अनेक विद्यार्थी आहेत. एकूणच करिअरची निवड हा यक्षप्रश्न विद्यार्थ्यांसमोर आहे. सध्याच्या काळात 'करिअर नियोजन' ला सर्वाधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. यावर सर्वांचेच एकमत व्हायला हरकत नाही. बदलत्या परिस्थितीनुसार, बदलत्या काळानुसार करिअरच्या वाटादेखील बदलत आहेत. अशा बदलांमध्ये संधी ओळखून योग्य वाट निवडतो तोच आपले करिअर उत्तमप्रकारे घडवू शकतो.

सरकारी नोकरीची भुरळ आजही सर्वाना आहे. परंतु सरकारी नोकरी म्हटली की, स्पर्धा परीक्षा ही आलीच. मूळात स्पर्धा परीक्षा कशासाठी? सरकारी नोकरी कशी मिळते? त्यासाठी पात्रता किती असावी लागते? त्यासाठी अर्ज कोठे मिळतात? निवडप्रक्रिया कशी असते? त्यासाठी वशिला (ओळखपत्र वगैरे) लागतो का? परीक्षेसाठी अभ्यासक्रम कोणता असतो असे व याहून निरनिराळे प्रश्न उमेदवारांच्या मनात काहूर निर्माण करतात आणि त्याच वेळी म्हणजेच योग्य वेळी, योग्य माहिती मिळाली नाही तर सरकारी नोकरी हे एक स्वप्नच उरते.

स्पर्धा परीक्षांची ओळख आता तर जवळपास सर्व विद्यार्थ्यांना झालेली आहे. स्पर्धा परीक्षांमधून विद्यार्थी आपले भवितव्य उज्ज्वल करू शकतात. अगदी दहावी-बारावी ही पात्रता असणा-या परीक्षांपासून ते अगदी पदवी परीक्षा ही पात्रता असणा-या परीक्षांची माहिती आपण या लेखात पाहू.

स्पर्धा परीक्षा ही फक्त चांगली नोकरी मिळवण्यासाठी नाही, तर चांगले उमेदवार संस्थेत (सरकारी, बँकिंग व इतर) सामावून घेण्यासाठी आहे. प्रत्येक संस्थेला / बँकेला चांगला कर्मचारी वर्ग आपल्याजवळ असावा

असे वाटत असते. आजच्या या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आणि प्रगती साधण्यासाठी चांगला कर्मचारीवर्ग हवा असतो. या स्पर्धेमुळेच नोकरीच्या शोधात असणा-या व स्पर्धा परीक्षांची तयारी करणा-या उमेदवारांना नोकरीच्या चांगल्या व जास्तीत जास्त संधी उपलब्ध होत आहेत. याच बँकांमधील होणा-या स्पर्धेचा लाभ उमेदवारांना चांगली नोकरी मिळवण्यासाठी होत आहे. म्हणूनच त्या दृष्टीने उमेदवारांनी स्वतःला तयार केले पाहिजे. स्पर्धेपासून दूर जाऊन चांगल्या नोकरीची अपेक्षा करता येणार नाही आणि म्हणूनच असे म्हणता येईल की, महत्त्वाकांक्षी तरुणांना स्पर्धेच्या युगात नोकरी मिळवण्यासाठी स्पर्धा परीक्षांचे चांगले माध्यम उपलब्ध आहे.

दहावी उत्तीर्ण असणा-या उमेदवारांना महाराष्ट्र शासनात लिपिक टंकलेखक पदावर काम करता येते. या परीक्षेतून निवड होणा-या उमेदवारांना राज्य शासनातील खात्यांमध्ये लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्त करण्यात येते. याशिवाय दहावी उत्तीर्णांसाठी स्टाफ सिलेक्शन कमिशन मार्फत मल्टी टास्किंग स्टाफ या पदासाठी परीक्षा घेतली जाते, बारावी उत्तीर्ण उमेवारांसाठी स्टाफ सिलेक्शन कमिशन मार्फत कंबाईंड हायर सेकंडरी लेव्हल या परीक्षेमार्फत लोअर डिविजनल क्लार्क या पदावर केंद्र शासनात नोकरी मिळते. आणि जर बारावीला ६०% गुण असतील तर विमा कंपन्यामार्फत (नॅशनल इन्शोरन्स, युनायटेड इन्शोरन्स, न्यू इंडिया इन्शोरन्स, ओरिएन्टल इन्शोरन्स, जनरल इन्शोरन्स) असिस्टंट पदासाठी अर्ज करता येतात.

पदवी परीक्षेनंतर भारतातील सर्वात मोठ्या पदावर म्हणजेच युपीएससी मार्फत होणा-या आयएएस / आयपीएस / आयएफएस परीक्षेकरिता उमेदवार अर्ज करू शकतात. त्याचप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणा-या राज्यसेवा परीक्षेसाठी उमेदवार अर्ज करू शकतात. याशिवाय पोलीस उपनिरीक्षक, असिस्टंट (सहाय्यक), विक्रीकर निरीक्षक पदासाठी अर्ज करू शकतात तसेच महाराष्ट्र

शासनातील विविध खात्यांमध्ये होणा-या भरतीसाठी सरळसेवा परीक्षेसाठी उमेदवार अर्ज करू शकतात. तसेच इंटेलिजन्स ब्युरो, प्रॉव्हीडंट फंड, इन्शोरन्स, रेल्वे या खात्यांमध्ये पदवीधर उमेदवार अर्ज करू शकतात. स्टाफ सिलेक्शन मार्फत कंबाईंड ग्रॅज्युएट लेव्हल परीक्षेसाठी अर्ज करता येतो. या परीक्षेतून इन्कमटॅक्स, कस्टम, एक्साईज मध्ये इन्स्पेक्टर, सीबीआय सब इन्स्पेक्टर ऑडिटर, अप्पर डिवीजनल क्लार्क अशा विविध पदांसाठी (यापैकी एक) निवड होते. याशिवाय युपीएससीमार्फत असिस्टंट कमांडट (सेंट्रल पोलीस फोर्स CPF) या पदासाठी अर्ज करता येतो.

सरकारी नोकरीच्या शोधात असणा-या उमेदवारांसाठी स्पर्धा परीक्षा हे एक उत्तम माध्यम आहे. अशा विविध पदांसाठी होणारी भरतीप्रक्रिया, त्यांचे अभ्यासक्रम, निवड प्रक्रिया, अर्ज कसा करावा, त्यासाठी असणारी वेबसाईट तसेच वयोमर्यादा या सर्व बाबींसाठी आपण संपर्कात राहणार आहोत जेणेकरून सर्व स्पर्धा परीक्षांची तसेच भरती प्रक्रीयेची माहिती नोकरीच्या शोधात असणा-या उमेदवारांना मिळेल.



# स्पर्धा परीक्षा जिंकण्यासाठी

हे स्पर्धेचे जग आहे. माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. संगणकाचे युग आहे हे आपण सतत ऐकतो, वाचतो आहोत. आयुष्य हीच जणू स्पर्धा आहे, हे जवळजवळ बरेच जण अनुभव घेत आहेत. स्पर्धा जिंकण्यासाठी बरेच चांगले गुण असायला हवेत, आत्मसात करायला हवेत. चिकाटी, जिद्द, एकाग्रता, सातत्य, मेहनत, प्रामाणिकपणा आणि संयम हे गुण असायलाच हवे. या शतकातच काय, हे गुण सर्वच शतकात उपयोगी असणारे गुण आहेत. या गुणांनी कोणतीही सामान्य व्यक्ती आपल्या जीवनाच सोनं बनविते. ऐन उमेदितील काळ म्हणजे सुवर्णकाळच आहे. हा काळ पुन्हा काही केल्या परत येणार नाही म्हणूनच या वयात आपल्या आयुष्याचे सोनं करायला हवे हा काळ म्हणजे जीवनध्येय निश्चितीचा काळ म्हणून याकडे पाहायला हवे, या आणि या वयात ज्याला या गोष्टी समजतात व त्याप्रमाणे जो कृती करून वाटचाल करतो तोच ही आयुष्याची स्पर्धा जिंकतो.

जसा दिवस लगेच संपतो, वर्ष सरते तसेच आयुष्यातील सुवर्णकाळ कधी संपला हे कळत देखील नाही. जे या सुवर्णकाळात भरीव काम करतात त्यांना याची खंत उरत नाही ते आणखी जोमाने नव्या उमेदीने सतत कार्य करत राहतात आणि अजरामर होतात. म्हणून स्पर्धा जिंकण्यासाठी चांगल्या गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक आहे तसेच दूरदृष्टी असणे हे ही महत्वाचे आहे. जॉन मोर्ले यांच्या मते, जीवनात अपयश का मिळते, याचे सर्वसामान्य प्रवाहपतित होण्यात आहे. केवळ एखादी संधी हुकली किंवा एखादी चूक केली म्हणून अपयश येत नाही. पण अनेक स्वरूपात येणा-या व आवाक्यात असलेल्या सर्व संधी सोडून देणे आणि आपले सामर्थ्य उधळेपणाने वाया घालवणे यामुळे अपयश येते.

यशस्वी माणूस हा एकाग्रतेने कार्य करणारा सर्वसामान्य माणूसच असतो. लहानपणापासूनच आपण अर्जुनाची व झाडावर बसलेल्या

पोपटाचा डोळा याची गोष्ट ऐकत आलेलो आहोत. तीच एकाग्रता अर्जुनाला महान धनुर्धर होण्यासाठी उपयुक्त ठरली.

स्पर्धा परीक्षांद्वारे उमेदवार आपले जीवनमान उंचावू शकतो. परंतु फक्त ब-याच जणांमध्ये याबद्दल बरेचसे गैरसमज असतात आणि त्यामुळे ब-याच शंका निर्माण झालेल्या असतात आणि त्या शंकाचे निरसन योग्य वेळी झाले नाही तर आयुष्याला नवी दिशा कदाचित मिळतच नाही. स्पर्धा परीक्षेची तयारी करणा-या उमेदवारांमध्ये संयम, सहनशीलता हे गुण असणे फार महत्त्वाचे आहे. कधी कधी संपूर्ण भरती प्रक्रियेला वेळ लागतो अशा वेळेस संयम व सहनशील वृत्तीच सावरू शकते अन्यथा नकारात्मक विचारसरणी उमेदवारांमध्ये वाढीस येऊ शकते.

अभ्यासाचे सुत्रबद्ध नियोजन केल्याशिवाय आपणास आपणाजवळ असलेल्या वेळेचा व्यवस्थितपणे व पुरेपुर वापर करता येत नाही. सहनशीलता गुण उमेदवारामध्ये असेल तर तो एखादे अपयश पचवून पुन्हा नव्याने तयारी करू शकतो. याबाबत अरविंद इनामदारांचे उदाहरण द्यायचे झाल्यास ते स्वतः पोलीस उपनिरीक्षक पदासाठी होणा-या परीक्षेत अपयशी झाले. परंतु त्यांनी ते अपयश पचवून युपीएससीची परीक्षा देऊन ते आयपीएस झाले आणि त्यामुळेच ते महाराष्ट्राचे पोलीस महानिरीक्षक होऊ शकले.

यशस्वी होण्यासाठी व्यवस्थितरीत्या व तंत्रपूर्ण अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. बहुतेक वेळा मुलांना या परीक्षेसाठीच्या अभ्यासाची योग्य दिशा सापडत नाही किंवा उशिरा सापडते. जिद्द व आत्मविश्वास न हरवलेले मोजके विद्यार्थी या परीक्षेत यशस्वी होतात. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना उमेदवाराला सर्व बाबींची, सर्व क्षेत्रांची माहिती करून घ्यावी लागते. पण त्याचबरोबर एखाद्या क्षेत्रातील ज्ञानाचा वापर दुस-या क्षेत्रात करण्यासाठीची कला त्यास येत असल्यास तो स्वतःची तयारी इतरांपेक्षा जलद आणि कार्यक्षमतेने करू शकतो.


प्रत्येक यशस्वी माणसाच यश हे अपयशाच्या अनेक पाय-यावर उभं असते. अडचणी, संकट, अपयश यांच्याशी सामना करण्यातच खरा पराक्रम असतो. त्यांच्याशी लढण्याने आपली कसोटी लागते (म्हणतातच ना सोन्याला अग्निपरीक्षा द्यावी लागते) आणि म्हणूनच संकटे अडचणी यामुळे माणसाने घाबरून न जाता त्यावर स्वार झाले पाहिजे. संकटांचे रुपांतर संधीत करणाराच स्पर्धा जिंकतो. हे लक्षात ठेवा की जर तुम्ही संकटाना घाबरलात त्याचा बाऊ केलात तर संकटे तुमच्यावर स्वार होतील आणि तुम्हाला नाउमेद करून सोडतील. लोकल ते ग्लोबल हा घडणारा बदल समजून घ्यायला हवा म्हणजेच दूरदृष्टी ठेवायला हवी.

स्पर्धा परीक्षेची तयारी करणा-याला प्रामाणिकपणा व नम्रतेच्या साह्याने आवश्यक ते ज्ञान मिळवता येते. यश मिळविण्यासाठी अभ्यास, सातत्य व जिद्द, मेहनत यांच्याइतकेच प्रामाणिकपणा व नम्रतेला महत्व आहे. नम्रता हा मानवी जीवनाचा स्थायीभाव समजला जातो. यशस्वी माणसाचे ते सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट समजले जाते. म्हणूनच म्हणतात ना, विद्या विनयेन शोभते.

स्पर्धा जिंकण्यासाठी स्वप्नरंजन न करता प्रत्यक्ष कृती आवश्यक आहे. परीक्षेचा अभ्यासक्रम समजून घेऊन त्याप्रमाणे अभ्यासाला सुरुवात व्हायला हवी. मी हे करीन, ते करीन अशा वायफळ गोष्टी बोलण्यात वेळ घालविणारे संपूर्ण आयुष्यच यात गमावून बसतात. स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी हे समाजोन्नतीसाठी मोलाचे योगदान करू शकतात. लक्षात घ्या नोकरीच्या संधी भरपूर मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत त्याचा लाभ उठवा आणि जीवनाला स्थैर्य मिळवून देण्यासाठी अभ्यासाची कास धरा. कित्येक विद्यार्थ्यांना वय निघून गेल्यानंतर या स्पर्धा परीक्षेचे महत्त्व लक्षात येते त्यानंतर पश्चातापाशिवाय काहीच उरत नाही. म्हणून मिळणा-या संधीचा पुरेपुर फायदा कोणत्याही परिस्थितीत घेतलाच पाहिजे.

आपल्या करिअरचे आपण जे स्वतः नियोजन करतो किंवा क्षेत्र ठरवितो ते फार महत्त्वाचे आहे. म्हणून प्रथम आयुष्यात ध्येय ठरवा आणि ध्येय गाठण्यासाठी ध्येयवेडे व्हा. ध्येयवेडी माणसे अथक परिश्रम करून, तहानभूक विसरून ध्येयाच्या दिशेने सतत वाटचाल करत राहतात आणि स्पर्धा जिंकतात.

चिकाटी आणि सातत्य या दोन गुणांनी तर बरीच किमया केली आहे. एखादा बुद्धिवान परंतु आळशी यशस्वी होत नाही. याउलट एखादा कमी हुशार परंतु मेहनती, चिकाटी आणि सातत्य राखणारा विद्यार्थी यशस्वी होतो. चला तर मग, नव्या आकांक्षाचे, नव्या स्वप्नांचे ध्येय गाठण्यासाठी तयारी करू या. सामाजिक आणि आर्थिक प्रगती गाठू या जागतिकीकरणाच्या या युगात स्वार होऊ या स्पर्धा जिंकण्यासाठी.



# स्पर्धा परीक्षा - अभ्यास आणि कौशल्य

स्पर्धा परीक्षा हा युवा पिढीसाठी अविभाज्य असा घटक बनत आहे. स्पर्धा परीक्षा माहित नाही अथवा स्पर्धा परीक्षा हा शब्द ऐकलेला नाही असा युवक सापडणे अशक्य. स्पर्धा परीक्षेत यश मिळवायचे म्हणजे अभ्यासाबरोबरच काही कौशल्य अंगिकारली पाहिजेत अथवा काही गुण आत्मसात केले पाहिजे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणा-या उमेदवारांमध्ये संयम हा एक अत्यावश्यक असणारा गुण असायला हवा. समजा पहिल्या अथवा दुस-या प्रयत्नात यश मिळेलच असे नाही. पहिल्या अथवा दुस-या प्रयत्नांनंतर आपण कोठे कमी पडत आहोत अथवा कोणता विषय अवघड जातो याची जाणीव होईल. परंतु ब-याचदा असे दिसून येते की, एक-दोन प्रयत्नांनंतर अपयश आले तर बरेचसे उमेदवार पुढच्या परीक्षांचे अर्ज भरत नाहीत आणि स्पर्धेतून पूर्णपणे बाहेर पडतात.

स्पर्धा जिंकण्यासाठी कौशल्य ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. अभ्यास करण्याचे कौशल्य, उपलब्ध वेळेचा सदुपयोग करण्याचे कौशल्य, अभ्यास लक्षात ठेवण्याचे कौशल्य, महत्त्वाच्या गोष्टींची नोंद करण्याचे कौशल्य इत्यादी सर्व गोष्टी स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक आहेत. अभ्यासातील नियमितपणा आणि सातत्य या दोन्ही गोष्टी कौशल्याबरोबरच महत्त्वाच्या आहेत.

स्पर्धा परीक्षांत यशस्वी होण्यासाठी सकारात्मक प्रवृत्ती देखील महत्त्वाची आहे. स्पर्धा परीक्षांबाबत बरेचसे गैरसमज आहेत. त्यामुळे स्पर्धा परीक्षांची तयारी करणा-या उमेदवारांनी हे लक्षात ठेवावे की स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून केवळ गुणवत्ता या निकषावरच उमेदवारांची अंतिमतः निवड केली जाते.

अभ्यास करताना एकाग्र चित्त असणे हे ही फार महत्त्वाचे आहे. अभ्यास करताना मानसिक स्थिती चांगली असणे हे देखील महत्त्वाचे आहे.

तणावपूर्ण मानसिक स्थितीत अभ्यास करणे कठीण जाते. त्या स्थितीत केलेला अभ्यास देखील लक्षात राहत नाही. त्यामुळेच उमेदवारांनी आपल्या मनावर कोणत्याही प्रकारचा तणाव निर्माण होऊ न देता अभ्यास करणे गरजेचे आहे.

स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासात समविचारी मित्रांची संगत असणे हे देखील लाभदायक ठरते. त्यातून गटचर्चा आणि विचारांची देवाणघेवाण होते. (समविचारी असल्यास वादविवाद होणार नाहीत आणि अभ्यास या मुद्द्यावर एकविचार होईल.) गटचर्चा आणि विचारांची देवाणघेवाण या माध्यमातून कमी वेळात अधिक ज्ञान प्राप्त करणे शक्य होते. यामुळे आत्मविश्वास निर्माण होतो. इतरांनी सांगितलेली माहिती लवकर लक्षात राहते.

या सर्व बाबींबरोबरच अभ्यासाचे ठिकाण तसेच तेथील वातावरण प्रसन्न आणि मनःशांती देणारे असणे गरजेचे आहे. प्रसन्न वातावरणाशिवाय मनाची एकाग्रता तयार होत नाही. अभ्यास करण्याचे ठिकाण आणि परिसर स्वच्छ असणेही गरजेचे आहे. केलेले वाचन लक्षात राहण्याच्या दृष्टीने वाचन केल्यानंतर त्याचे मनन आणि चिंतन करणे गरजेचे आहे.

स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणे म्हणजेच पूर्णपणे व्यक्तिमत्व विकास होय. मुलाखतीची वेगळी तयारी करायची गरज पडायला नको, आणि म्हणूनच प्रत्येक उमेदवाराने आपली दैनंदिन वर्तणूक सात्विक सोज्वळ ठेवणे गरजेचे आहे. आपण उद्याचे सरकारी / बँक अधिकारी म्हणजेच इतरांसाठी आदर्श ठरण्यासाठी आपल्या विचारात, आचारात आणि वागण्यात पावित्र्य ठेवायला हवे. असे पावित्र्य आपल्या वागण्यात असेल तर आपल्यात अंतरिक उर्जा निर्माण होऊन ध्येय प्राप्त करण्याच्या दृष्टीने योग्य दिशेने वाटचाल करण्याची सकारात्मक इच्छाशक्ती निर्माण होते. स्पर्धा परीक्षांत यशस्वी होण्यासाठी सकारात्मक इच्छाशक्ती फार आवश्यक आहे.

शालेय स्तरावरील अभ्यासक्रम व्यवस्थितपणे अभ्यासल्यास स्पर्धा परीक्षेचा बराचसा अभ्यास चांगल्या रितीने पूर्ण होईल. इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, सामान्य विज्ञान यांचा प्रथम शालेय स्तरावरील अभ्यासक्रम पूर्ण करून घ्यावा. जेणेकरून प्राथमिक स्तरावरील अभ्यास तसेच उजळणी पूर्ण होईल. गणितातील सूत्रे तसेच शॉर्टकट्स योग्य रीतीने अभ्यासली तर सर्वाधिक कठिण वाटणारा तसेच सर्वाधिक वेळ खाणारा हा विषय तुम्हाला सर्वाधिक गुण देणारा ठरेल हे ही विसरू नका. गणित हा सर्वच स्पर्धा परीक्षांतील महत्त्वाचा विषय असल्याने त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. (तसेच कोणत्याही विषयाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.)

तुमचे स्वप्न आयएएस / आयपीएस अथवा डेप्युटीकलेक्टर / डीवायएसपी / इन्कमटॅक्स ऑफिसर / बँक अधिकारी अथवा यापैकी कोणतेही असले तरी येणा-या सर्व परीक्षांचे अर्ज भरावेत. जेणेकरून आपला अभ्यास योग्य दिशेने चालला आहे किंवा नाही याची जाणीव होईल. ब-याचदा माझा अभ्यास पूर्ण झाला नाही तर मग मी परीक्षेला कसे जाऊ? हा ही प्रश्न उमेदवाराच्या मनात येतो. (युपीएससी परीक्षा सोडून कारण त्यासाठी परीक्षा किती वेळा दयावी याला मर्यादा आहेत.) असा कोणताही प्रश्न मनी न बाळगता केलेल्या अभ्यासावर परीक्षेला सामोरे जाणे हितावह ठरते. (अभ्यास पूर्ण झाला आहे असे जवळपास एक टक्क्याहूनही कमी मुलांना वाटत असते.)

स्पर्धा परीक्षेने सर्वांगीण विकास होत असतो. अभ्यासामुळे आपल्या वागण्यात-बोलण्यात आपोआप सकारात्मक बदल घडायला लागतात. म्हणूनच या अभ्यासाने देशाचा / राज्याचा सर्वांगीण विकास घडविण्याचा प्रत्येक उमेदवाराने प्रयत्न करायला हवा.

# स्पर्धा परीक्षा - नियोजन

**'स्पर्धा तिथे प्रगती'** हे वाक्य सर्वच क्षेत्रांसाठी लागू आहे. स्पर्धेशिवाय प्रगती नाही हे आत्ता सर्वांनाच कळालेले आहे. स्पर्धापरीक्षा ही आत्ता जीवनाची अविभाज्य बाब बनलेली आहे, आणि म्हणूनच जर ही टाळता न येणारी गोष्ट बनली असेल तर तिचे नियोजन करायला हवे. वेळेचे नियोजन, अभ्यासाचे नियोजन, अभ्यासतंत्राचे नियोजन, आणि साहजिकच आपल्या आयुष्याचे नियोजन.

यासाठी प्रथम आपण जीवनातील काही महत्त्वाच्या बाबी समजून घेऊ. लहानपण - प्रौढत्व - वृद्धत्व हि स्थित्यंतरे येणारच. काही केले अथवा केले नाही तरी या गोष्टींशिवाय जीवन नाही हे समजून घ्यायला हवे. म्हणजेच प्रौढ काळ चांगला घालवायचा असेल तर लहानपणीच (शालेय व महाविद्यालयीन स्तरावर) त्याचे नियोजन करायला हवे. उदाहरणार्थ जर एखाद्याला एमबीबीएस अथवा बीडीएस डॉक्टर व्हायचे असेल तर महाविद्यालयीन नव्हे तर शालेय स्तरावर त्याचा विचार व नियोजन व्हायला हवे. आठवी-नववीपासूनच दहावीला चांगले गुण मिळवण्यासाठी नियोजन करायला हवे जेणेकरून सायन्सला अपेक्षित महाविद्यालयात प्रवेश मिळावा व त्यानंतर बारावीच्या परीक्षेत आणि त्याचबरोबर सीईटीच्या परीक्षेत उत्तम गुण मिळायला हवेत जेणेकरून मेडिकल अभ्यासक्रमास प्रवेश मिळेल आणि त्यानंतर तो अभ्यासक्रम चांगल्या रितीने पूर्ण करायला हवा. जेणेकरून त्याचा पुढील अभ्यासक्रमासाठी अथवा कामासाठी उपयोग होईल, अशाप्रकारे नियोजनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणूनच म्हणतात ना, If you fail to Plan, You plan to fail.

आणि वृद्धापकाळ चांगला जावा यासाठीचे नियोजन प्रौढत्वातच करायला हवा, म्हणजेच आपण जर चांगली नोकरी मिळवली आणि

येणा-या पैशांचे योग्यप्रकारे नियोजन केले तर तुम्हाला वृद्धापकाळात टेन्शन येणार नाही तर पेन्शन मिळेल. म्हणूनच अभ्यासाचे-स्पर्धा परीक्षेचे नियोजन करायला हवे. स्पर्धा परीक्षांचा अभ्यासक्रम पाहून घ्या व त्यानुसार नियोजन करा. स्पर्धा परीक्षांमध्ये सामान्य ज्ञान, गणित, बुद्धिमापन चाचणी व इंग्रजी या विषयांचा समावेश होतो.

सामान्य ज्ञान या घटकात इतिहास, भूगोल, नागरिक शास्त्र, अर्थशास्त्र व चालू घडामोडी या घटकांचा समावेश होतो. चालू घडामोडी या घटकासाठी वर्तमानपत्राचे वाचन गरजेचे आहे. त्यानुसार दररोज अभ्यासाव्यतिरिक्त वर्तमानपत्राच्या वाचनाचे नियोजन करायला हवे. आवश्यक व महत्त्वाच्या बाबींची नोंद करून ठेवायला हवी. तसेच या घटकात **सर्वात पहिले, सर्वात लहान, सर्वात मोठे** अशा घटकांची नोंद करून लक्षात ठेवायला हवी. चालू घडामोडी या घटकात राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, भौगोलिक घडामोडींची नोंद करून ठेवायला हवी. आणि जर तुम्ही बँकिंग परीक्षेची तयारी करीत असाल तर बँकेच्या संबंधित सर्व संज्ञा, चालू घडामोडींची नोंद करून ठेवायला हवी.

गणित विषयाचा अभ्यास करताना प्रथम गणितातील संबोध, नियम व सूत्रे समजून घ्यायला हवीत. गणिताचा अभ्यास करताना प्रथम अचूकता व नंतर गती या दोन्ही गोष्टींवर भर द्यायला हवा. वर्ग व घन पाठ करून ठेवावेत. गणितातील शॉर्टकट्स पद्धतीचा अवलंब केल्यास उदाहरणे जलद सोडविण्यास मदत होईल. प्रथम घटकानुरूप अभ्यास करावा म्हणजेच प्रथम संख्या व संख्या प्रणाली, सरासरी, गुणोत्तर व प्रमाण, शेकडेवारी, नफा - तोटा, सरळव्याज व चक्रवाढ व्याज.... अशा पद्धतीने अभ्यास करून नंतर एकत्रित गणिते सोडविण्याचा प्रयत्न करावा. दररोज किमान ३० उदाहरणे सोडवण्याचा सराव करायला हवा. दररोज जी उदाहरणे सोडविणार आहात ती कधी सोडवायची याचे नियोजन करायला हवे.

इंग्रजी या घटकाचा अभ्यास करताना प्रथम अभ्यासक्रम समजून घेऊन त्यानुसार प्रथम काळ व त्याची रूपे, समानार्थी व विरुद्धार्थी शब्द, गाळलेल्या जागी योग्य शब्द निवडणे या बाबींचा सराव करायला हवा. यासाठी शब्दसंग्रह वाढवायला हवा. वाक्यातील चूक ओळखणे यासाठी व्याकरणाचे नियम समजून घ्यायला हवे. **No sooner - than, unless, so - that** अशा गोष्टीचा वापर समजून घेणे गरजेचे आहे.

बुद्धिमापन चाचणी या घटकाचा अभ्यास करताना संख्यामालिका, मालिकेचे सूत्र ओळखणे, मालिकेतील चुकीची संख्या अथवा वर्ण शोधणे, वर्णमालिका, अक्षरांची लयबद्ध रचना, सांकेतिक भाषा, समान - संबंध, विसंगत घटक, दिशाविषयक प्रश्न, नाते-संबंधावरील प्रश्न, तुलनात्मक प्रश्न, बैठक व रांगेतील प्रश्न, इनपुट-आउटपुट, आकृतीतील गाळलेल्या जागी योग्य संख्या अथवा वर्ण शोधणे अशा प्रकरणांचा प्रथम अभ्यास करून घ्यायला हवा. गणिताच्या अभ्यासाप्रमाणेच यासाठी दररोज ३० उदाहरणे सोडविणे आवश्यक आहे. यासाठी वेळेचे नियोजन करायला हवे. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून आपले करिअर उत्तम घडविता येईल. यासाठी गरज आहे ती नियोजनाची आणि साहजिकच नियोजनाबरोबर मेहनत, जिद्ध, चिकाटी आणि संयम हे गुण अंगी बाळगायला हवेत. स्पर्धा परीक्षेत पहिल्या प्रयत्नात यश मिळेलच हे सांगता येत नाही आणि हल्ली तसा योगही दुर्मिळ होत चालला आहे म्हणून जर पहिल्या प्रयत्नात यश मिळाले नाही तर स्पर्धा परीक्षेची वाट सोडू नका, अभ्यासाची कास सोडू नका हा अभ्यासच तुमचे भवितव्य उज्ज्वल करणार आहे.

म्हणूनच आपणाजवळ असलेल्या वेळेचे नियोजन करा आणि हो लक्षात ठेवा **'टाईमपास आयष्यात नापास'**. मला हे जमणार नाही, मी हे करू शकत नाही, हे मी नंतर करीन, माझा मूड नाही, माझं नशीब चांगलं नाही ही वाक्यं तुमचे आयुष्य नकारात्मक करतील म्हणूनच सकारात्मक दृष्टीकोन ठेवून स्पर्धा परीक्षेची तयारी करा.

# स्पर्धा परीक्षा - अभ्यास तंत्र व क्षमता

स्पर्धा परीक्षा हा एकमेव नोकरीचा राजमार्ग आहे हे आत्तापर्यंत सर्वच तरुणांना समजलेले आहे. या राजमार्गावरून यशस्वीपणे चालणाराच (अभ्यास प्रामाणिकपणे व नियमितपणे करणारा) ठरविलेले ध्येय प्राप्त करतो. म्हणूनच म्हणतात ना 'जो थांबला तो संपला' आणि हा तर या जगाचा अलिखित नियम आहे. जो स्वतःहून पुढे सरकत नाही तो मागे पडतो. बरेचदा त्याला मागे ढकलले जाते (उदाहरण द्यायचेच झाले तर मुंबई सारख्या ठिकाणी सकाळी लोकल पकडण्यासाठी जो प्रयत्न करत नाही तो कदाचित थांबूनच राहतो त्या गर्दीकडे बघत.) जिथे प्रगती होत नाही तिथे अधोगती होते. जिथे उन्नती होत नाही तिथे अवनीतीची सुरुवात होते. जिथे विकास होत नाही तिथे विनाश होतो. जिथे चालणं होत नाही तिथे सगळं संपलेलच असते.

वेदांमध्ये म्हटले आहे, 'चरैवेती, चरैवेती, चरैवेती, .....**चालत राहा, चालत राहा**' नुसतं बसून राहणा-याच नशीबसुद्धा झोपून जाते. जो मेहनती आहे, क्रियाशील आहे त्याच भाग्यचक्र गरागर फिरत. गतीमध्येच प्रगती दडलेली असते आणि प्रगतीशील आयुष्य हेच सर्वश्रेष्ट आयुष्य.

हे सर्व सांगण्याचा उद्देश म्हणजे स्पर्धा परीक्षा ही आपल्यातील चिकाटीची, जिद्धीची, प्रामाणिकपणे सातत्यपूर्ण अभ्यास करण्याच्या वृत्तीची तसेच क्षमतेची परीक्षा घेत असते. क्षमतेला मर्यादा असत नाहीत. वापराने क्षमता वाढते. न वापरल्यास ती गंजते. वक्त्याची वक्तृत्वशैली, संशोधकाची संशोधन वृत्ती, विद्यार्थ्यांची अभ्यासूवृत्ती, खेळाडूचे खेळण्यातील कौशल्य, क्षमतेप्रमाणे विकसित होत असते. काल आपण काय चांगले किंवा किती चांगले काम केले, आज त्यात कशी आणि किती भर घालता येईल असा विचार करा. काल जर काही चुका झाल्या

असतील तर त्या आज दुरुस्त करा, आणि असे केल्यास प्रगती हमखास होते.

आपले ध्येय ठरावा, त्यानुसार आखणी करा, ध्येयाजवळ पोहोचण्यासाठी वाट ठरवा, प्रयत्नपूर्वक व प्रामाणिक अभ्यासाने वाटचाल सुरु करा त्यामुळे आपण किती दूर आहोत हे समजते व त्याप्रमाणे प्रयत्न करता येतात. ध्येय गाठता येते व स्वप्न साकार होतात. अडचणींच्या वेळी आत्मविश्वास उपयोगी पडतो. जगाला आश्चर्य चकित करण्याची क्षमता त्यात आहे. आपल्यातील क्षमतेला कमी लेखू नका तसेच ती क्षमता योग्य ठिकाणी, योग्य दिशेने, योग्य वेळेला वापरा, प्रयत्नपूर्वक क्षमता वाढवा. स्वामी विवेकानंद, डॉ. आंबेडकर, महात्मा गांधी, जोतीबा फुले, डॉ. अब्दुल कलाम अशा महान व्यक्तींच्या यशाचे रहस्य हेच आहे.

स्पर्धा परीक्षांची तयारी करताना अर्ज कधी निघतील? परीक्षा किती दिवसांनी / महिन्यांनी आहे? हा विचार करण्यापेक्षा आपल्याजवळ असलेल्या वेळेचा जास्तीत जास्त उपयोग अभ्यासासाठी करावा. जवळपास सर्व स्पर्धा परीक्षांचा अभ्यासक्रम सारखा असल्याने त्यातील सामायिक घटकांचा अभ्यास करणे सुरु ठेवावा. उदाहरणार्थ गणित, बुद्धिमान चाचणी व इंग्रजी हे जवळपास सर्व स्पर्धा परीक्षांसाठी अनिर्वाय असे विषय असल्याने या विषयांचा अभ्यास सुरु ठेवावा. प्राथमिक सामान्य अध्ययन या घटकाचा अभ्यास करून घ्यावा.

आपले ध्येय युपीएसपी परीक्षेतून आयएएस / आयपीएस होण्याचे असले तरीही स्टाफ सिलेक्शन कमिशन अथवा बँक प्रोबेशनरी ऑफिसर या परीक्षांचे अर्ज भरून परीक्षा द्यावी. या परीक्षा म्हणजे आपल्या ध्येय परीक्षेपूर्वीची प्रिलियम परीक्षा आहे असे समजून या परीक्षांना सामोरे जावे. जेणेकरून आपली तयारी कितपत झाली आहे हे समजते आणि जरी आपले ध्येय बँकिंग परीक्षेतून बँकेत नोकरी मिळवण्याचे असले तरीही सरळसेवा परीक्षा, युपीएससी, स्टाफ सिलेक्शन कमिशन, एमपीएससी या परीक्षांना प्रिलियम परीक्षा (दहावीची बोर्ड परीक्षा

देण्यापूर्वी जसे शाळेत युनिट टेस्ट, सहामाही परीक्षा, प्रिलियम अशा सराव परीक्षा होतात तसे) समजून याही परीक्षांना सामोरे जावे.

सामान्य अध्ययन या घटकाचा अभ्यास करताना प्रथम शालेय स्तरावरील इतिहास, भूगोल, नागरिक शास्त्र, अर्थशास्त्र, सामान्य विज्ञान या विषयांच्या पुस्तकाचे वाचन करावे. इंग्रजी विषय अभ्यासतांना व्याकरण तसेच उता-यावरील प्रश्न या बाबींचा व्यवस्थित सराव करून घ्यावा. गणित या घटकांचा अभ्यास करताना गणितातील सूत्रे, वर्ग, घन, गणितातील मुलभूत संकल्पना यांचा व्यवस्थित अभ्यास करून घ्यावा.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे पोलीस उपनिरीक्षक, सहाय्यक, विक्रीकर निरीक्षक तसेच लिपिक - टंकलेखक या पदांसाठी परीक्षा होत असतात. त्याशिवाय स्टाफ सिलेक्शन कमिशन तर्फे कंबाईंड ग्रॅज्युएट लेव्हल, कंबाईंड हायर सेकंडरी लेव्हल परीक्षा होत असतात. युपीएससीची सिव्हील सर्व्हिसेस परीक्षा, स्टेट बॅंकेतर्फे अधिकारी व लिपिक पदांसाठी परीक्षा तसेच २० राष्ट्रीयकृत बँकांमध्ये आयबीपीएस मार्फत परीक्षा होत असतात. इतक्या विविध नोकरीच्या संधी स्पर्धा परीक्षांची तयारी करणा-या उमेदवारांना मिळत असतात.

म्हणून या संधीचा लाभ घेण्यासाठी आपण तयार असायला हवे. परीक्षा आल्यावर पाहू, अर्ज निघाल्यावर अभ्यास करू हा दृष्टीकोन, हा विचार नैराश्य पसरवेल. त्यामुळे सकारात्मक विचार ठेवून परीक्षा वर्षभरात कधीही होऊ दे, मी तयार आहे हा विचार ठेवून लागा अभ्यासाला करावा. आपली क्षमता तपासण्यासाठी, क्षमता वाढविण्यासाठी आणि आपले भवितव्य उज्ज्वल करण्यासाठी. संधी ओळखा, नियोजन करा, संधीचे सोने करा, आपले जीवनमान उंचावण्यासाठी आणि देशसेवेसाठी, समाजसेवेसाठी!

# स्पर्धा परीक्षांसाठीची भूमिका व पूर्वतयारी

मागील काही वर्षात स्पर्धा परीक्षांची तयारी करणा-या उमेदवारांमध्ये लक्षणीय वाढ दिसून येत आहे. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात बारावी नंतर विद्यार्थ्यांचा ओढा डॉक्टर, इंजिनिअर होण्याकडेच जास्त प्रमाणात होता. परंतु मागील काही वर्षामध्ये दहावी / बारावी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचा कल स्पर्धा परीक्षेकडे झुकलेला दिसतो आहे. पालकांची भूमिका देखील आपल्या पाल्याला सरकारी नोकरी मिळावी जेणेकरून त्याचे करिअर स्थिरस्थावर होईल अशीच आहे.

कोणत्या पालकाला आपल्या पाल्याने मोठे होऊ नये असे वाटते? याचे उत्तर नक्कीच: म्हणजेच प्रत्येक पालकास असे वाटते की, आपल्या मुलाने / मुलीने फार मोठे व्हावे, समाजात मानसन्मान, प्रतिष्ठा मिळवावी. परंतु या फक्त इच्छा, अपेक्षा बाळगून काहीही होणार नाही त्याकरीता कुटुंबातील वातावरणही पोषक असायला हवे तसे नसेल तर निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. (पोषक वातावरण म्हणजे फक्त पुस्तके, अभ्यासाचे साहित्य पुरविणे नव्हे) पोषक वातावरण ज्यामुळे विद्यार्थ्याला अभ्यास करण्यात रुची निर्माण होईल, एखादी व्यक्ती (आंबेडकर, गांधीजी, स्वामी विवेकानंद, अथवा या काळातील आयएएस / आयपीएस अधिकारी) रोल मॉडेल म्हणून ठेवावी.

स्पर्धा परीक्षेद्वारे विविध संधींची उमेदवारांना जाणीव करून देणे. विविध विषयावर पाल्यांशी मनमोकळया चर्चा कराव्यात. अवांतर वाचन वाढविण्यावर भर द्यावा ज्यामुळे विद्यार्थी सखोल विचार करू शकेल.

स्पर्धा परीक्षेची तयारी करताना प्रथम शालेय स्तरावरील अभ्यासक्रम पूर्ण केल्यास चांगल्या प्रमाणात अभ्यास पूर्ण होतो. आणि त्यानंतर गणित, बुद्धिमापन चाचणी या घटकांच्या तयारीसाठी रोजच्या रोज प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करा. सरकारी सेवेतच स्पर्धा परीक्षा नाही तर


खासगी क्षेत्रात नोकरी करायची असल्यास गरजेची आहे आणि हे ही लक्षात ठेवा की, स्पर्धा परीक्षेद्वारे सरकारी सेवेत नोकरी न मिळवू शकणारे इतर व्यवसायांमध्ये अथवा खासगी क्षेत्रामध्ये महत्त्वाच्या पदावर कार्यरत आहेत. त्यांनासुद्धा चांगल्या प्रकारे वेतन मिळत आहे आणि समाजात मानसन्मान आणि प्रतिष्ठा. परंतु हे सर्व शक्य आहे अभ्यासामुळे आणि मेहनतीमुळेच. त्यामुळे मानसन्मान, प्रतिष्ठा आणि पैसा मिळविण्यासाठी सरकारी नोकरी आवश्यक आहे हा गैरसमजसुद्धा मनातून पालकांनी आणि उमेदवारांनी काढून टाकायला हवा. स्पर्धा परीक्षांची तयारी करणा-या उमेदवारांनी समविचारी विद्यार्थ्यांशी एकत्रित बसून अभ्यास केल्यास त्याचा नक्कीच फायदा होईल. तसेच गटचर्चा करावी. दिवसातून किमान दहा तास अभ्यास करणे गरजेचे आहे.

फक्त वाचन नव्हे तर पाच तासाच्या वाचनानंतर किमान एक तास लेखन करणे गरजेचे आहे. वाचन झाल्यानंतर उजळणीसाठी स्वतःच्या नोट्स तयार करा. स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले जाणारे प्रश्न हे अत्यंत क्लिष्ट, विश्लेषणात्मक स्वरूपाचे असल्याने कोणत्याही विषयाचा अभ्यास योग्य दिशेने आणि योग्य पद्धतीने करणे आवश्यक ठरते. त्यामुळे स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना मागच्या काही वर्षाच्या प्रश्नपत्रिका सोडविणे गरजेचे आहे.

'स्पर्धा परीक्षा' अगदी पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होणे ही एक दुर्मिळ गोष्ट बनलेली आहे. पहिल्या प्रयत्नात स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होत नाहीत असे नाही त्यासाठी पूर्वतयारी फार गरजेची आहे. यासाठी बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर लगेचच स्पर्धा परीक्षेच्या पूर्व तयारीस सुरुवात करणे गरजेचे आहे आणि तीच योग्य वेळ आहे आपले करिअर निवडण्याची.

बारावीपासून स्पर्धा परीक्षेची तयारी करणा-या उमेदवारांनी आपल्या कॉलेजमधील परीक्षेतील अभ्यासावर याचा कोणताही विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घ्यावी लागणार आहे. यासाठी योग्य

पद्धतीने वेळापत्रक तयार करायला हवे. चालू घडामोडीचा अभ्यास करताना दररोज एखाद-दुसरे चांगले वर्तमानपत्र वाचन करणे गरजेचे आहे. मराठी वर्तमानपत्राबरोबरच इंग्रजी वर्तमानपत्र वाचन करणे आवश्यक आहे जेणेकरून इंग्रजी सुधारणेला ही वाव मिळेल. बारावी नंतरच्या तीन वर्षाचे अभ्यासाच्या दृष्टीने नियोजन करून वेळापत्रक बनविल्यास व त्यादृष्टीने वाटचाल केल्यास स्पर्धा परीक्षांत उत्तीर्ण होणे ही अवघड बाब होणार पूर्वतयारी करा आणि स्पर्धा परीक्षांत यशस्वी व्हा.



# स्पर्धा परीक्षांतील गणिताची तयारी

सरकारी, निमसरकारी किंवा खासगी क्षेत्रात नोकरी मिळवायची म्हणजे स्पर्धा परीक्षा आलीच. परीक्षा म्हणजे ओघाने अभ्यास आलाच आणि पाठोपाठ अभ्यासक्रम असे चक्र. कोणतीही बँक, विमा कंपनी, रेल्वे, प्रॉव्हीडंट फंड, एमपीएससी, यूपीएससी, स्टाफ सिलेक्शन कमिशन, असो स्पर्धा परीक्षा अनिवार्य आहे. योग्य व चांगला उमेदवार निवडण्यासाठी स्पर्धा परीक्षेचे तंत्र वापरले जाते. त्यासाठी ठराविक अभ्यासक्रम (विषय) निश्चित केलेले असतात. जवळपास सर्व स्पर्धा परीक्षांत गणित हा विषय असतोच, तसेच हा विषयच इतर सर्व विषयातील यश मिळवून देणारा अथवा खाली खेचणारा विषय आहे. त्यामुळेच गणित या विषयाला सर्वाधिक महत्त्व प्राप्त झाले आहे तसेच ब-याच उमेदवारांचा गणित हा विषय नावडता असतो.

शाळेत गणितातील मुलभूत संकल्पना (कन्सेप्ट) स्पष्टपणे न कळल्यामुळे ते कच्चेच राहिलेले असतात. जेव्हा पदवीनंतर जे स्पर्धा परीक्षांची तयारी करायला सुरुवात करतात त्यांना गणित हा विषय अभ्यासणे गरजेचे ठरते. गणित हा विषय आत्मविश्वास निर्माण करणारा आहे. अगदी शालेय जीवनापासून आपण ऐकत आलो आहोत ते म्हणजे गणित विषयाचा सराव केल्यास तो अवघड वाटत नाही, परंतु स्पर्धा परीक्षात फक्त गणित सोडविणे हे महत्त्वाचे नसून येथे वेळेला फार महत्त्व आहे. स्पर्धा परीक्षांत गणित वेळेत सोडवायचे असल्याने आपणास गणितातील शॉर्टकट्स माहित असायला हवेत. सरावाने अचूकता तर शॉर्टकट्समुळे गणित वेळेत सोडविता येतात. बँकिंग तसेच स्टाफ सिलेक्शन कमिशन, परीक्षेतील गणित या विषयाची काठीण्य पातळी फार उच्च असते आणि आता तर एमपीएससी ने ही गणित या विषयाची काठीण्य पातळी उंचावलेली आहे. म्हणूनच सोपी-सोपी उदाहरणे सोडवून स्वतःचे समाधान करून घेण्यापेक्षा काठीण्य पातळीच्या उदाहरणांचा सराव

करणे आवश्यक आहे. दररोज गणित सोडविण्याचा सराव करणे महत्त्वाचा आहे. गणित या विषयाच्या स्पर्धा परीक्षात साधारणपणे पुढील घटकांचा समावेश असतो.

**१) संख्या व संख्या प्रणाली** - यात संख्याज्ञान, संख्यापद्धती, संख्येमधील अंकांची स्थानिक किंमत, संख्यांची तुलना, लहान व मोठी संख्या ठरविणे, दिलेल्या अंकांच्या सहाय्याने लहान किंवा मोठी संख्या तयार करणे, संख्यांचा चढता व उतरता क्रम लावणे, सम संख्या, विषम संख्या, मूळ संख्या, संयुक्त संख्या, त्रिकोणी संख्या, जोडमूळ संख्या, सहमूळ संख्या यावर आधारीत प्रश्न असतात.

**२) अपूर्णांक** - दशांश अपूर्णांक, अपूर्णांक युक्त अपूर्णांक, अपूर्णांकांची बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार, लहान अथवा मोठा अपूर्णांक शोधणे, अपूर्णांकांचा चढता अथवा उतरता क्रम लावणे, अपूर्णांकांचा लसावि / मसावि काढणे.

**३) शतमान - शेकडेवारी** - दिलेल्या संख्येची शेकडेवारी काढणे, रकमेची शेकडेवारीनुसार विभागणी करणे, एखाद्या वस्तूची किंमत ठराविक शेकड्याने वाढली त्यामुळे ठराविक खप कमी झाला तर एकूण उत्पन्नावर होणारा शेकडा परिणाम काढणे.

**४) सरासरी** - दिलेल्या संख्यांची सरासरी काढणे, दिलेल्या क्रमवार सम अथवा विषम संख्यांची सरासरी काढणे, दिलेल्या संख्यांपैकी दोन भाग करून त्यांची सरासरी दिलेली असताना पुरावृत्ती झालेली संख्या शोधणे, एखाद्या गटात एखादी व्यक्ती आल्याने सरासरी वय / वजन वाढले अथवा कमी झाले तर नवीन व्यक्तीचे वय / वजन माहित करणे.

**५) गुणोत्तर - प्रमाण** - चार प्रमाणित संख्यांपैकी तीन संख्या दिलेल्या असताना चौथी माहित करणे, वयाशी संबंधित गुणोत्तर - प्रमाणावरील प्रश्न, शेकडेवारीशी संबंधित गुणोत्तर - प्रमाणावरील उदाहरणे.

**६) भागीदारी** - समान भांडवल व भिन्न मुदत असताना नफा अथवा नुकसान माहित करणे, भिन्न मुदत व भिन्न भांडवल असताना नफा अथवा नुकसान माहित करणे, नफा अथवा नुकसान दिले असताना तसेच

दोन भागीदारांपैकी एकाचे भांडवल माहित असताना दुस-याचे भांडवल माहित करणे.

७) **सूट, कमिशन व दलाली -** शेकडा सूट / कमिशन / दलाली माहित करणे, शेकडा सूट / कमिशन / दलाली दिली असताना मूळ रक्कम माहित करणे, क्रमवार शेकडा सूट दिल्यास ती एकत्रितपणे किती ते माहित करणे.

८) **नफा - तोटा -** खरेदी किंमत व विक्री किंमत दिली असताना शे.नफा अगर शेकडा तोटा काढणे, दिलेल्या शेकडा नफा अथवा शेकडा तोटा नुसार विक्री किंमत / खरेदी किंमत दिलेली असताना खरेदी किंमत / विक्री किंमत काढणे.

९) **सरळ व्याज व चक्रवाढ व्याज -** दिलेल्या रकमेवरील सरळ व्याज / चक्रवाढ व्याज माहित करणे, सरळ व्याज दिले असताना मुद्दल, मुदत, दर यापैकी दोन माहित असताना तिस-याची किंमत काढणे. दिलेल्या रकमेवरील सरळ व्याज व चक्रवाढ व्याज यातील फरक काढणे.

१०) **काळ व काम -** एक व्यक्ती ठराविक दिवसात काम पूर्ण करते तसेच दुसरी व्यक्ती तेच काम ठराविक दिवसात करते हे दिले असताना दोघे मिळून किती दिवसात काम पूर्ण करतील.

याशिवाय नळ व हौद, आगगाडीवरील उदाहरणे, अंतर-वेग व वेळ, बोट व प्रवाहावरील उदाहरणे, वयावरील उदाहरणे, भूमिती व क्षेत्रफळ यावरील उदाहरणे, संभाव्यता, घड्याळावरील उदाहरणे अशा घटकांचा यात समावेश केलेला असतो. गणित हा स्पर्धा परीक्षांतील फार महत्त्वाचा तसेच यश ठरविणारा विषय असल्याने तसेच व्याप्तीदेखील फार मोठी असल्याने अभ्यासातील सातत्यच आपणास या विषयातील प्राविण्य प्राप्त करण्यास उपयुक्त पडेल. बारावी उत्तीर्णांसाठी केंद्र शासनात लिपिक पदासाठी तसेच स्टेट बँक ऑफ इंडीयातर्फे लिपिक तसेच आयबीपीएस तर्फे २० राष्ट्रीयकृत बँकांत भरती प्रक्रिया सुरु असते. त्यासाठी अभ्यासाला सुरुवात करण्यास हिच योग्य वेळ आहे. अभ्यासासाठी शुभेच्छा.

# मराठीचा सराव आणि आत्मविश्वास



मराठी खरे तर आपली रोजच्या व्यवहारातील भाषा, पण या विषयाच्या अभ्यासक्रमाचा आपण विचार करणार आहोत. भरपूर अभ्यासाबरोबरच मागील प्रश्नपत्रिका वेळेत सोडविण्यावर भर द्यावा. अभ्यास भरपूर केलेला असेल, परंतु प्रश्नपत्रिका सोडविण्यावर भर दिला नाही, तर वेळेचे नियोजन करता येणार नाही तर अभ्यासाचा उपयोग होणार नाही हे लक्षात ठेवा. त्यामुळे पेपर सोडविण्याचा सराव करणे हे आवश्यक आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे होणा-या परीक्षांमध्ये मराठी हा विषय अनिवार्य आहे. नुकत्याच विक्रीकर खात्यामध्ये नव्याने तयार केलेल्या टॅक्स असिस्टंट या पदासाठी होणा-या परीक्षेमध्ये मराठी हा विषय आहे, तसेच विक्रीकर खात्यामध्ये विक्रीकर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक व असिस्टंट (सहाय्यक) या पदासाठी होणा-या मुख्य परीक्षेत मराठी विषय आहे. या परीक्षेसाठी दिलेल्या अभ्यासक्रमावरील विचारल्या जाणा-या प्रश्नांद्वारे उमेदवारांची कुशाग्रबुद्धी, निर्णयक्षमता तसेच आकलन क्षमता तपासली जाते.

प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सर्वात महत्त्वाचा घटक अभ्यासाबरोबरचा सराव होय. त्यामुळे आत्मविश्वास वाढून यशाची खात्री निर्माण होते. महाराष्ट्राच्या प्रशासनात म्हणजे मराठी भाषेच्या प्रदेशात मराठी भाषेचे ज्ञान असणे अनिवार्य आहे. तसेच शासनामध्ये मराठी भाषेचा वापर

वाढत असल्याने उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान किती आहे? हे तपासण्यासाठी शब्दसमूह, शब्दसंग्रह, व्याकरण, म्हणी व वाक्यप्रचार, वाक्यरचना व उता-यावरील प्रश्न या प्रकारच्या प्रश्नांचा यात समावेश केलेला असतो.

**शब्दसमूह व शब्दसंग्रह** - या घटकात अनेक शब्दांबद्दल एक शब्द, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, संदर्भ शब्द, परभाषेतील शब्द, शब्दार्थ न जुळणारा शब्द, अलंकारीत शब्द, वाक्याचा संदर्भ लक्षात घेऊन पर्यायी शब्द निवडणे अथवा त्या शब्दाचा अर्थ लक्षात घेऊन विरुद्धार्थी शब्द निवडणे, एकाच अर्थाचे शब्द, प्रत्यय लागलेले शब्द, सामाजिक शब्द  अशा प्रकारच्या प्रश्नांचा यात समावेश केलेला असतो.

**वाक्यरचना** - या घटकात वाक्यातील प्रयोग ओळखणे, शुद्ध वाक्य ओळखणे, प्रयोगाचे  रुपांतर करणे, प्रयोगाचे गुणधर्म, मिश्र वाक्याचे केवल वाक्यात रुपांतर, वाक्याचा प्रकार ओळखणे, गटात न बसणारे वाक्य ओळखणे, दिलेल्या वाक्याची अर्थपूर्ण रचना करणे, वाक्याचा काळ ओळखणे इत्यादी प्रश्नांचा यात समावेश केलेला असतो.

**व्याकरण** - या घटकात वृत्ते, नाम व नामाचे प्रकार, क्रिया व क्रियापदे, विभक्ती, संधी, अलंकार, पद्य रचना, शब्दशक्ती, समास, वचन व लिंग, उद्गारवाचक अव्यय, विभक्ती प्रत्यय, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय, वाक्यातील अधोरेखित केलेल्या शब्दांची अथवा शब्दसमूहाची जात ओळखणे अशा प्रश्नांचा यात समावेश केलेला असतो.

**वाक्य प्रचार व म्हणी** - या घटकात वाक्यप्रचाराचा व म्हणीचा अर्थ ओळखणे, म्हणी पूर्ण करणे, अशा प्रश्नांचा यात समावेश केलेला असतो.

**उता-यावरील प्रश्न** - या प्रकारच्या प्रश्नामध्ये एक उतारा दिलेला असून त्यावर प्रश्न विचारले जातात.  साधारणपणे उता-याचा विषय हा मानवी वृत्ती, संत, वर्णन (व्यक्ती अथवा निसर्ग) सांस्कृतिकविषयक उतारा,

उदबोधक उतारा, समाजसुधारक अथवा थोर विचारवंत यावरील उतारा असा असतो. या घटकात प्रश्नांची उत्तरे वाचून शोधायची असतात.

मराठी विषयाचा अभ्यास करताना अवांतर वाचन फार महत्त्वाचे आहे. वाक्यप्रचार व म्हणी यांचा पुस्तकातून अभ्यास करण्याबरोबरच इतर ठिकाणी आढळणारे वाक्यप्रचार व म्हणी यांच्याकडे लक्ष द्यावे. दैनंदिन व्यवहारातील मराठी भाषेत रूढ झालेले परभाषेतील (विशेषतः इंग्रजी) शब्द सहजपणे आपण वापरत असतो. हे शब्दच आपल्याला वाक्यातील त्या ठिकाणी योग्य व अचूक वाटतात. ते समर्पकपणे अर्थही स्पष्ट करीत असतात, अशा रुळलेल्या काही वैशिष्ट्यपूर्ण शब्दांचा अर्थ माहित करून घेणे आवश्यक आहे. त्याचा संदर्भही जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

मराठी भाषा दैनंदिन व्यवहारातील सरावाची आहे, म्हणून तिच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नये. शेवटच्या टप्प्यावर मराठीचा अभ्यास करू. असे देखील ठरवू नका, असे केल्यास माहीत नसलेल्या ज्ञानामुळे तुमचा गोंधळ उडेल. प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव केल्याने आत्मविश्वास वाढेल आणि हा आत्मविश्वास आपणास प्रत्यक्ष परीक्षेची प्रश्नपत्रिका सोडविताना, उत्तर लिहिताना बळ देतो, हे लक्षात ठेवा.

**अभ्यासासाठी उपयुक्त संदर्भ साहित्य -**

- सुगम मराठी व्याकरण लेखन - मो. रा. वाळिंबे.
- नवनीत सुलभ मराठी व्याकरण व लेखन - पद्मिनी बिनीवाले.
- इयत्ता ७ वी ते १० वी ची व्याकरण पुस्तके.
- मराठी व्याकरण - प्रा. जगन्नाथ जाधव.
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मराठी विषयाच्या नोट्स.
- टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या मराठी भाषेच्या नोट्स.
- मराठी वाक्यप्रचार व म्हणी - प्रा. रघुनाथ कडवे.

# लक्ष्य सरकारी नोकरी

सरत्या वर्षाच्या अखेरीस आपण कुठला ना कुठला संकल्प करतो आणि हा संकल्प नवीन वर्षात पूर्ण कसा करता येईल याचा विचारही करतो. वर्षात ब-याच चांगल्या-वाईट घटना घडत असतात. वाईट गोष्टी विसरून चांगल्याच गोष्टींचा म्हणजेच सकारात्मक गोष्टींचा आपण विचार करायला हवा. भारतातील पहिली मोनोरेल सुरु झाली. मेट्रो रेल्वे मुंबईत धावू लागली. तशाच आपल्या जीवनातही ब-याच चांगल्या-वाईट घटना घडल्या असतील. त्यातील सर्व घटनांचा विचार करा.

आपण कुठे चुकलो आहोत का? आपली प्रगती झाली आहे का? चुकला असाल तर चूक सुधारली आहे का? आपले या वर्षातील प्रगती पुस्तक चांगले दर्जेदार होते का? कुटुंबाला माझ्याकडून असलेल्या अपेक्षा मी पूर्ण करू शकलो का? मी करीत असलेल्या नोकरीत मी समाधानी आहे का? असे प्रश्न स्वतःला विचारा आणि स्वतःमधून मिळणा-या उत्तरांचा व्यवस्थित विचार करा.

एखादे ध्येय समोर ठेवून त्या दिशेने वाटचाल व्हायला हवी. या वर्षी आपण ठरवल्यानुसार कितपत पल्ला गाठू शकलो? जे ध्येय ठरवले होते, ते साध्य करण्याच्या दृष्टीने खरोखरीच प्रयत्न केले का, याचे स्वतःच अवलोकन करायला हवे. आपण ठरवलेले ध्येय साध्य करता आले नसेल तरीही खचून जाऊ नका. आगामी वर्षात भरपूर संधी येतील, त्यांचा लाभ घ्या आणि आपल्या करिअरची वाटचाल योग्य दिशेने करा. समजा, या वर्षी ध्येय साध्य करण्याचा प्रयत्नात कसूर केली असेल तर ती चूक नव्या वर्षात होऊ देऊ नका. स्पर्धा परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांनी तर वर्षभराचे वेळापत्रक आखून अभ्यासाचे नियोजन करा.

स्पर्धा परीक्षांची तयारी करणा-या उमेदवारांनी प्रथम ध्येय निश्चित करा. त्या दिशेने प्रयत्नांची सुरुवात करा. आपल्या पंखाना बळ मिळते ते भरारी घेण्यासाठी. विविध संस्थांच्या माध्यमातून होणा-या भरती,

तसेच विविध पदासाठी, विविध खात्यांमार्फत निघणारे विविध अर्ज या सर्व बाबींवर लक्ष ठेवून असायला हवे. परीक्षेचे अर्ज निघाल्यावर परीक्षेची तयारी करणे, हे यश मिळवण्यासाठी पुरेसे नसते. स्पर्धा परीक्षांचे अर्ज निघण्यापूर्वीच तुम्ही तुमच्या अभ्यासाचा पाया मजबूत करायला हवा आणि त्याचा चांगला परिणाम तुम्ही अनुभवालच.

या येणा-या नवीन वर्षात कोणकोणत्या नवीन पदांसाठी अर्ज निघणार आहेत याची अंदाजित माहिती या लेखासोबत देत आहे. त्यामुळे आगामी वर्षात आपल्याला कोणत्या परीक्षा देता येतील आणि त्याच्या तयारीला प्रारंभ करायला हवा. याचा एक ठोकताळा तुम्हांला मनाशी बांधता येईल आणि ठरवलेले ध्येय साध्य करता येईल.

स्पर्धा परीक्षांची तयारी पुरेशा गांभीर्याने आणि परीक्षा पद्धती लक्षात घेऊन केली तर ती योग्य दिशेने सुरु राहते. अभ्यास करताना संबंधित परीक्षा देणा-या इतर परीक्षार्थींशी संपर्कात राहिल्याने प्रयत्नाना जोर चढतो. अभ्यास विषयक चर्चामधून आपण कितपत पाण्यात आहोत याचाही अंदाज स्वतःला येतो.

परीक्षा जवळ आली की, या आधीच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी पुरेसा वेळ द्यायला हवा आणि ज्या विषयांमध्ये आपण कमी पडतो त्याची तयारी अधिक उत्तम रीतीने कशी करता येईल या कडेही पुरेसे लक्ष द्यायला हवे. या आधीही स्पर्धा परीक्षा दिलेल्या आणि त्यात अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांनी आपल्या अपयशाची कारणे पडताळून पाहायला हवीत.

नव्या दमाने स्पर्धा परीक्षांची तयारी करायला हवी. स्पर्धा परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक लक्षात घेत अभ्यासाची मोट बांधा आणि योग्य दिशेने प्रयत्न करा. यश तुमचेच आहे.

# रिझर्व बँक ऑफ इंडिया ग्रुप ‘बी’ ऑफिसर पदाची तयारी

रिझर्व बँक ऑफ इंडियाने हे दशक म्हणजे रिटायरमेंट (निवृत्तीचे) दशक म्हणून जाहीर केले आहे त्यामुळेच याला नोकरीचे दशक म्हणावं अशा प्रकारे विविध बँकातर्फे, कंपनी तर्फे, स्टाफ सिलेक्शन, एमपीएससी व इंशोरन्स तर्फे गेल्या नऊ दहा वर्षात जाहिराती प्रसिद्ध होत आहेत. तरी सुद्धा नोकरी शोधणा-यांची / नोकरी नाही - आहे / आज काल नोक-या मिळतात कुठे? असे म्हणणा-यांची संख्या दसपटीने वाढत आहे. मग या गेल्या नऊ - दहा वर्षात निघालेल्या नोक-या मिळाल्या कुणाला? याच उत्तर एकदम साध व सरळ आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी योग्य पद्धतीने करणा-या विद्यार्थ्यांना.

एका परीक्षेत अपयश मिळाले म्हणून हार न मानता अथवा स्पर्धा परीक्षांतून नोकरी मिळवणे आपले काम नाही हे विचार न करणा-या विद्यार्थ्यांना. म्हणूनच स्पर्धा परीक्षांतून तुमचे संपूर्ण व्यक्तिमत्व घडते व तपासले जाते. जे चिकाटीने अविरत मेहनत करून अभ्यासात सातत्य राखतात त्यांना यश मिळते व गेल्या नऊ-दहा वर्षातील नोक-याही अशाच विद्यार्थ्यांनी पटकावल्या. याउलट एकदा-दोनदा अपयश आल्यानंतर स्पर्धा परीक्षांची वाट सोडून जाणा-या विद्यार्थ्यांना काही काळातच जाणवते की या अभ्यासाशिवाय पर्यायच नाही परंतु कदाचित त्यावेळेस वेळ निघून गेलेली असते. ती काही केल्या परत न येण्यासाठी म्हणूनच ब-याचदा मी म्हणत असतो - **‘टाईमपास? आयुष्यात नापास’**

स्पर्धा परीक्षांची तयारी करणा-या विद्यार्थांनो तुम्ही अभ्यासाची कास सोडू नका, हा अभ्यासच तुमचे जीवन उज्ज्वल व सुंदर बनविणार आहे. आता हेच पाहा ना, रिझर्व बँक ऑफ इंडियातर्फे असिस्टंट पदासाठी तसेच रिझर्व बँक ऑफ इंडियातर्फे ग्रुप ‘बी’ ऑफिसर पदासाठी जाहिरात प्रसिद्ध जवळपास दरवर्षी प्रसिद्ध होते. तसेच आता दोन महिन्यात आयबीपीएस मार्फत २० राष्ट्रीयकृत बँकांमध्ये तसेच क्लार्क पदासाठी आणि अधिकारी पदासाठी परीक्षा घेण्यात येतील. दहावी उत्तीर्ण

उमेदवारांसाठी स्टाफ सिलेक्शन कमिशन मार्फत कंबाईंड हायर सेकंडरी लेव्हल या परीक्षांसाठी अर्ज मागविण्यात येतात. स्टेट बॅंकेतर्फे लिपिक पदासाठी अर्ज मागविण्यात येतात. अशाप्रकारे बँकिंग व सरकारी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर भरती होत असते. आपण रिझर्व बँकेतर्फे होणा-या ग्रेड बी ऑफिसर पदासाठीच्या भरती प्रक्रिये संबंधी माहिती या लेखात घेणार आहोत. ग्रेड 'बी' ऑफिसर पदासाठी पदवी अभ्यासक्रमात ६० टक्के अथवा त्याहून अधिक गुण असणारे उमेदवार अर्ज करू शकतात. रिझर्व बँक म्हणजे देशातील अग्रेसर व केंद्रिय बँक होय. या बँकेत नोकरी मिळवण्याची संधी स्पर्धा परीक्षांची तयारी करणा-या उमेदवारांना मिळत असते.

**परीक्षेचा अभ्यासक्रम व तयारी -**

अधिकारी पदासाठी एकूण तीन स्तर उमेदवारांना पार करावे लागतात. पहिल्या स्तरावर वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरूपाचा पेपर आहे, तर दुस-या स्तरावर लेखी परीक्षा असते परंतु त्यात बदल करून तो पेपरही वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरूपाचा करण्याचा आला आहे. तिस-या स्तरावर उमेदवाराला मुलाखतीला सामोरे जावे लागणार आहे. पहिल्या स्तरावरील परीक्षेत एकूण चार विषय असून यासाठी एकूण २०० गुण ठेवण्यात आले आहेत. यात इंग्रजी, सामान्य अध्ययन, गणित व बुद्धिमापन चाचणी असे चार विषय आहेत.

(१) **इंग्रजी** - या घटकावर मुख्यत्वे व्याकरणावर आधारीत प्रश्नांचा समावेश केलेला असतो. यात समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द, अनेक शब्दांबद्दल एक शब्द, वाक्यातील चूक ओळखणे, दिलेल्या पर्यायातून योग्य शब्द निवडणे अशा प्रश्नांचा यात समावेश केलेला असतो.

(२) **सामान्य ज्ञान** - या घटकात बँकिंग व अर्थशास्त्रावर आधारीत प्रश्न विचारले जातात. तसेच भारताचे शेजारील राष्ट्रांशी असणारे संबंध,

प्रसिद्ध व्यक्ती व महत्त्वाच्या घडामोडी, लेखक व पुस्तके, कला व सांस्कृतिक घडामोडींवर आधारीत प्रश्नांचा यात समावेश असतो.

(३) **गणित** - बँकिंग परीक्षेत गणित या विषयाची काठिण्य पातळी फार उच्च असते. यात सरळरूप द्या, वॉडमास या नियमावर आधारीत प्रश्न, सरासरी, काळ-काम व वेग, अंतर-वेग व वेळ, शतमान, शेकडेवारी, नफा-तोटा, गुणोत्तर-प्रमाण, भागीदारी, मिश्रणावर आधारीत प्रश्न, सरळव्याज व चक्रवाढ व्याज, तसेच डाटा इंटरप्रिटेशन व डाटा स्फिशिएंसीवर आधारीत प्रश्न या घटकात विचारले जातात.

(४) **बुद्धिमापन चाचणी** - या घटकात शाब्दिक बुद्धिमापन व अशाब्दिक बुद्धिमापन चाचणी असे दोन विभाग पडतात. यात संख्यामालिका, वर्णमालिका, सांकेतिक भाषा, समान संबंध विसंगत घटक, दिशाविषयक प्रश्न, वेन - आकृत्या, विधाने-अनुमान घड्याळ व कालमापनावरील उदाहरणे, इनपुट-आऊटपुट तसेच निर्णयक्षमता तपासणारे प्रश्न, विधाने, गृहीतके अशा प्रश्नांचा यात समावेश केलेला असतो. अशा प्रकारचा अभ्यासक्रम हा पूर्वपरीक्षेसाठी आहे, तर या पूर्वपरीक्षेत उत्तीर्ण होणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेसाठी बोलाविण्यात येते. मुख्य परीक्षेत इंग्रजी, आर्थिक व सामाजिक घडामोडी, फायनान्स व मॅनेजमेंट अशा तीन विषयांचा यात समावेश केलेला आहे. प्रत्येक विषयासाठी १०० गुण देण्यात आलेले आहेत.

(५) **इंग्रजी** - या विषयात निबंध, सारांश लेखन, उता-यावरील प्रश्न, विविध प्रकारचे पत्रलेखन अशा घटकांचा समावेश केलेला असतो.

(६) **आर्थिक व सामाजिक घडामोडी** - वाढ व प्रगती नॅशनल इन्कम व परकॅपिटा इन्कम, दारिद्र्य निर्मुलन, फिस्कल पॉलिसी, खासगीकरण, इंडस्ट्रीयल ॲण्ड लेबर पॉलिसी, भारतातील आर्थिक घडामोडी, आर्थिक नियोजनाचा सहभाग व फायदे, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय आर्थिक

संस्था, प्रादेशिक, आर्थिक सहकार, सामाजिक न्याय, सामाजिक चळवळ, भारतीय राजकारण, स्वास्थ्य व शिक्षण या घटकांचा यात समावेश आहे.

**(७) फायनान्स व मॅनेजमेंट -** प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर, बजेट, कॅपिटल मार्केट, मनी मार्केट ॲण्ड फॉरेन एक्सेंज मार्केट, स्टॉक एक्सेंज आणि त्यांचे नियम, सेबीचे कार्य, ग्रोथ ॲण्ड ऑपरेशन  ऑफ मनी मार्केट, एक्सेंज रेट मॅनेजमेंट, आर्थिक विकासात बँकांची व आर्थिक संस्थांची भूमिका, डिसइनव्हेस्टमेंट इन पब्लिक सेक्टर युनिट मॅनेजमेंट प्रोसेस नियोजन, लीडरशिप थियरी, संस्थेमध्ये मॅनेजरची भूमिका, लीडरचे कार्य, करिअर प्लानिंग, ट्रेनिंग ॲण्ड डेव्हलपमेंट. अशा प्रकारचा अभ्यासक्रम असून योग्यरीतीने अभ्यास केल्यास तुम्ही निश्चितच होऊ शकता ग्रेड ‘बी’ अधिकारी तर मग लागा तयारीला.



# स्पर्धा परीक्षा - मानसिकता सक्सेस मंत्र

स्पर्धा परीक्षा हा शिक्षणाचा नव्हे तर जीवनाचाच एक अविभाज्य घटक बनलेला आहे. स्पर्धा परीक्षेची सुरुवातच होते ती शालेय जीवनापासून...... चौथी स्कॉलरशीप, पाचवीला गणित प्राविण्य, कौशल्य, संबोध, प्रज्ञा परीक्षा, सहावीला डॉ. होमी भाभा बालविज्ञान परीक्षा, सातवीला पुन्हा स्कॉलरशीप, आठवीला प्रज्ञा शोध परीक्षा, आणि नववीला डॉ. होमी भाभा विज्ञान परीक्षा आणि मग दहावीला बोर्डाची परीक्षा (बोर्डाची परीक्षा स्पर्धा परीक्षा नसली तरी कोणाला वाटते कमी मार्क मिळाले तरी चालतील? यावरून ही स्पर्धा नाहीतर काय?) या झाल्या आपणास परिचित असलेल्या स्पर्धा परीक्षांची माहिती याशिवाय अशा कितीतरी खाजगीरित्या चालवीत असलेल्या स्पर्धा परीक्षांचा मी येथे उल्लेखच केलेला नाही.

या सर्व परीक्षांना शालेय स्तरावर बगल दिली किंवा कमी अभ्यास करून परीक्षेला सामोरे गेले तरी चालेल परंतु पदवी परीक्षेनंतर नोकरीची वाट धरून म्हटले तर स्पर्धा परीक्षावाटेवर उभीच आहे आणि तीला बगल देऊन अथवा त्या परीक्षेचा कमी अभ्यास करून परीक्षेला सामोरे जायचे म्हटले तर नोकरी मिळणार नाही म्हणूनच स्पर्धा परीक्षा ही आता जीवनाचा अविभाज्य घटक आहे हे सत्य नाकारून चालणार नाही.

मग स्पर्धा परीक्षेशिवाय नोकरी शक्यच नाही हे समजल्यावर...... आपण शालेय जीवनातच हा अभ्यास करायला हवा होता? अशा विविध शंका मनात निर्माण होतात. परंतु स्पर्धा परीक्षांची तयारी करणा-या उमेदवारांनी प्रथम लक्षात ठेवावे की जरी आपण शालेय जीवनात अशा परीक्षांना सामोरे गेलो नसू तरीही यश मिळविणे अवघड नाही यासाठी काही गोष्टी आवर्जून लक्षात ठेवाव्यात त्या म्हणजे स्पर्धा परीक्षांसाठीची मानसिकता प्रथम आपण तयार केली पाहिजे.

आणि या मानसिकतेमध्ये साहजिकच आवश्यकता आहे ती सकारात्मक प्रवृत्तीची, (परीक्षा उत्तीर्ण होणारच) कठोर परिश्रम, परीक्षेचे तंत्र आणि चिकाटीबरोबरच सखोल व तंत्रपूर्ण अभ्यासाची. स्पर्धा परीक्षेत कदाचित पहिल्याच प्रयत्नात यश मिळणार नाही परंतु पहिल्याच प्रयत्नांत यश मिळत नाही अथवा मिळालेले नाही म्हणून स्पर्धा परीक्षांची वाट सोडणारे नव्वद टक्क्यांपेक्षाही अधिक उमेदवार सापडतील. हे आपणास जमणार नाही, हे फारच कठीण आहे, या परीक्षांसाठी म्हणजेच नोकरी मिळविण्यासाठी वशिला पाहिजेच अशी विविध कारणे स्वतःशी व नंतर त्या कारणांचे समर्थन करणारी उदाहरणं शोधून इतरांना सांगत आपल्या अपयशाचे खापर दुस-या कोणत्याही (नशीब, वशिला.....) गोष्टींवर फोडून स्पर्धा परीक्षेच्या शर्यतीतून स्वतःच माघार घ्यायची. पहिल्या दुस-या परीक्षेनंतर तर आपणास कदाचित अभ्यासक्रम, अभ्यासाची दिशा अथवा आपण करत असलेली तयारी कितपत सदिश (योग्य दिशेने) जात आहे हेच कळते तसेच आपण कोठे चुकतो आहोत आपणास आणखी कोणकोणत्या गोष्टींची गरज आहे ज्यामुळे आपण यशस्वी होऊ हे कळते. आणि हो तुमचे ध्येय यूपीएससी / एमपीएससी अशा परीक्षांचे लक्ष्य गाठणे हे जरी असेल तरी सर्व स्पर्धा परीक्षांना आपण बसावे हे सांगून मी पहिला-दुसरा प्रयत्न हे येथे नमूद करत आहे.  वर्षभरात ब-यापैकी परीक्षा आपण देऊ शकतो.

उदा. आयबीपीएस पीओ, आयबीपीएस क्लार्क, स्टाफ सिलेक्शन कंबाईंड ग्रॅज्युएट लेव्हल, कंबाईंड हायर सेकंडरी लेव्हल, इन्श्युरन्स, स्टेट बँक ऑफिसर, स्टेट बँक क्लार्क, प्रॉव्हीडंट फंड, असिस्टंट कमिशनर, इंटेलिजन्स ब्युरो शिवाय कोर्ट व सरळसेवा परीक्षा.

स्पर्धा परीक्षेच्या वाटेवरून जाताना ही जरी खडतर असेल तरी अनिवार्य आहे आणि मला इच्छीत ठिकाणी नेईल आणि मी जाणारच हा निर्धार करून या राजमार्गावरून चालायला हवे. आणि मग आपण दुस-या मुद्द्याकडे वळू तो म्हणजे कठोर परिश्रम. कठोर परिश्रमा शिवाय

कोणतेही यश मिळत नाही. थोडासा अभ्यास आणि झटपट यश या भ्रमात राहू नका निराशा पदरी पडेल.

आत्ताच डॉ. सदानंद दाते व मनीषा म्हैसकर यांच्या बरोबर एका स्पर्धा परीक्षेच्या कार्यक्रमात एकत्र येण्याची संधी मिळाली. तेव्हा या दोन यशस्वी आयपीएस व आयएएस अधिका-यांनी किमान एक वर्ष दररोज कमीतकमी १२ तास अभ्यास हेच त्यांच्या यशाचे व त्यांच्या सहका-यांच्या यशाचे गमक सांगितले. यातून उमेदवार जर साधारण दर्जाचा असेल तर या पेक्षा जास्त अभ्यास आवश्यक आहे.

कठोर परिश्रमा बरोबर अभ्यासाचे तंत्र देखील महत्वाचे आहे. गणितातील शॉर्टकट्स हा एक तंत्राचाच भाग म्हणायला हवा. कठोर परिश्रमाला अभ्यासाच्या तंत्राची जोड महत्वाची आहे. हे युग स्पर्धेचे, ज्ञानाचे, संगणकाचे आहे. म्हणूनच सखोल अभ्यास तुम्हाला ज्ञानी बनविणार आहे आणि त्यामुळे तुम्हाला स्पर्धा जिंकणे सोपे होणार आहे हे लक्षात घ्या. स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी अभ्यासाची कास सोडू नका. लक्षात ठेवा. Winners never quit, and quitters never win

तर मग लागा अभ्यासाला WINNER होण्यासाठी…

व्यक्तिमत्व सुंदर नसेल तर दिसण्याला काहीच अर्थ नाही. कारण सुंदर दिसण्यात अन सुंदर असण्यात खूप फरक असतो.

स्पर्धा परीक्षार्थींच्या जीवनाला कलाटणी देणारे पुस्तक -

# स्पर्धा परीक्षांचे अभ्यासतंत्र

आज महाराष्ट्रातील अनेक तरुण भारतीय प्रशासनाचे अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून असतात; पण त्या विद्यार्थांना अनेकदा योग्य मार्गदर्शनाअभावी अपयशाला सामोरे जावे लागते. स्पर्धा परीक्षांचे स्वरूप नेमके कसे असते, निवड प्रक्रिया कशा पद्धतीने राबवली जाते, मुलाखत कशी द्यावी यांसारखे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांना पडत असतात. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचा मार्ग सुकर करण्यासाठी जयसिंगपूर येथील कवितासागर प्रकाशनाच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास सिरीज अंतर्गत **लेखक संजय मोरे** द्वारा लिखित **'स्पर्धा परीक्षांचे अभ्यासतंत्र'** या पुस्तकाच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांची योग्य दिशा ठरवण्यासाठी विद्यार्थी-पालक-शिक्षक यांना मोलाची मदत होणार आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्यासाठीचे तंत्र अवगत करणे आवश्यक आहे. बँकिंग परीक्षेचेही तंत्र आत्मसात केल्यास बँकिंग स्पर्धा परीक्षा कठीण नाहीत. हे तंत्र जीवनाला कलाटणी देणारे आहे. स्पर्धा परीक्षांविषयी जाणीव जागृतीचा एक निश्चित पल्ला आपण गाठला आहे. मोठ्या संख्येने तरुणाई या क्षेत्राकडे वळताना दिसत आहे. करिअरविषयी स्पष्टता आणि प्रशासकीय सेवांविषयीचा स्पष्ट दृष्टिकोन आजच्या तरुणाईकडे आहे. नुकतंच प्रकाशित झालेलं **'स्पर्धा परीक्षांचे अभ्यासतंत्र'** या पुस्तकामुळे हा दृष्टिकोन आणखी धारदार होईल, हे निश्चित.

येत्या काळात राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये नोकरीच्या लाखो संधी विद्यार्थ्यांना खुणावत आहेत. बँकिंग क्षेत्र विस्तारते आहे. बँकिंगविषयक प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होईल; मात्र विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षार्थी होऊ नये. परीक्षेपुरता अभ्यास करण्यापेक्षा अभ्यास करण्याची पद्धती विकसित करावी. परीक्षेबाबत न्यूनगंड बाळगण्याचे कारण नाही. भोवतालच्या जगातली स्पर्धा प्रचंड वाढते आहे. त्यामुळेच स्वतःची आवड बघण्यापेक्षा कुणीतरी यशस्वी झाला म्हणून आपणही त्यात यशस्वी होऊ, अशा पद्धतीने करिअरची निवड केली जात आहे. ही स्पर्धा करियरसाठीच आहे असे वाटावे असे चित्र निर्माण होत आहे. असे जरी असले तरी आपली स्पर्धा ही इतर कुणाशी नसून आपल्या स्वतःशीच आहे, असा विचार करूनच विद्यार्थ्यांनी आपले करिअर निवडले पाहिजे.

स्पर्धा परीक्षांचे अभ्यास करणारे उमेदवार, मग ते पूर्व-मुख्य-मुलाखत अशा कोणत्याही टप्प्यावर असोत, त्यांच्यासाठी **'स्पर्धा परीक्षांचे अभ्यासतंत्र'** योग्य मार्गदर्शक ठरेल. दहावी, बारावीपासून किंवा पदवी-पदविकेच्या वाटेवर असणारे विद्यार्थी, ज्यांना पुढील काळात प्रशासकीय सेवांची वाट चोखाळायची आहे, त्यांच्यासाठी हे पुस्तक परफेक्ट गाईड ठरेल. पाल्यांच्या करिअरविषयी चिंतेत असणा-या पालकांना स्पर्धा परीक्षा समजून घ्यायला हे पुस्तक उत्तम पर्याय आहे. अलीकडे काही नवे बदल परीक्षा प्रक्रियेत झाले. परीक्षेच्या अभ्यासक्रमासह पॅटर्न बदलला. अभ्यासक्रम, प्रश्नांचे बदलते स्वरूप, बदलणारा पॅटर्न या सर्व गोष्टी लक्षात घेता, अभ्यासाची दिशा नेमकी कसी असावी, बदलांचे नेमके स्वरूप काय असावे, या बदलांना सामोरे जाण्यासाठी कशी तयारी केली पाहिजे, या सर्व बाबींचा ऊहापोह साध्या सोप्या भाषेत व अभ्यासू पद्धतीने लेखक संजय मोरे यांनी केला आहे. तयारी करणा-यांच्या दृष्टीने पूर्व-मुख्य-मुलाखत या परीक्षेच्या सर्व टप्प्यांविषयी मार्गदर्शन या एकाच पुस्तकात मिळू शकते. गुणवत्ता यादीत येणारे तेवढेच विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होतात, असे नाही. सामान्य बुद्धिमत्तेचेही विद्यार्थी बॅंकिंग परीक्षेतून निवडले जाऊ शकतात; मात्र परीक्षेची पद्धती, बॅंकेसंबंधित विषय समजून घेतले पाहिजेत. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास, केलेले वाचन यातून जीवनात यशस्वी होण्याचे धडे मिळतात. शिक्षणाला मर्यादा नाहीत. त्यामुळे ज्ञान मिळेल तिथून घेतले पाहिजे.

जगात सुमारे 7500 करिअर आहेत. आपल्याला तर त्यातील काही बोटांवर मोजणा-या करिअरचीच माहिती आहे. करिअर निवडण्यासाठी एक विशिष्ट पद्धती निर्माण झाली पाहिजे. मित्र किंवा मैत्रीण जी शाखा निवडेल, तिकडे आपण जायचे किंवा आजूबाजूचे मित्र किंवा नातेवाइकांच्या चर्चेतून जी शाखा चांगली वाटेल, अशा शाखेमध्ये प्रवेश घ्यायचा, अशा पद्धतीने सर्वसाधारणपणे शिक्षणक्षेत्र निवडले जाते. त्यामुळे स्वत:च्या आवडी-निवडी व नक्की या क्षेत्रातून मला काय शिकता येईल व या क्षेत्रामध्ये पुढे गेल्यावर मला कोणता स्कोप आहे, याचा विचारच विद्यार्थ्याने केलेला नसतो. आपले ध्येयसुद्धा कोठेतरी लिपिक किंवा शिपाई होण्याचे नसावे. त्यामुळे प्रचंड मेहनत करून, 30-40 वर्षे रियाझ करून शास्त्रीय गायक व्हावे व बिस्मील्लाखॉं

यांच्यासारखे सनईवादक व्हावे, असा विचार करताना विद्यार्थी दिसत नाहीत. आताची पिढी जरा हिशोबी आहे. तिला पैशांचा हिशोब पटकन समजतो व पैशांच्या भाषेत सांगायचे तर सरकारी नोकरीतील अधिका-याच्या पगारापेक्षा जास्त पैसे एकाच मैफलीमध्ये मिळू शकतील व प्रचंड नावदेखील होईल; पण असे क्षेत्र निवडावे, असे मुलांना वाटत नाही. इंग्रजीमध्ये अशी एक म्हण आहे की, **'वरच्या पातळीवर अजिबात स्पर्धा नाही. कोणत्याही शिडीच्या पहिल्या पायरीपाशी जातानाच सर्वांत जास्त गर्दी असते.'** 90 टक्के विद्यार्थी त्या शिडीच्या पहिल्या पायरीजवळूनच परत येतात. जे 10 टक्के विद्यार्थी शिडीपर्यंत पोचतात त्यापैकी शिडीचे वरचे टोक गाठेपर्यंत फारच थोडे विद्यार्थी उरलेले असतात.

उदाहरणच घ्यायचे झाले तर शहरी मुले कोणालाही न सांगता गुपचूप स्पर्धा परीक्षांचे फॉर्म भरतात व पालकसुद्धा त्यांना तसा सल्ला देतात हे अतिशय दुर्दैवी आहे. कारण ही स्पर्धा कोणत्याही एका बिल्डिंगमधील मुलांची नसून बाहेरील 5 लाख मुलांशी होत आहे हे लक्षात घ्यावे. किंबहुना मला असे वाटते, की ही स्पर्धा इतरांशी नाहीच, ती आपल्या स्वत:शीच आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. शिवाय जे करायचे आहे, त्याचा आधी प्लॅन तयार करायला हवा. प्लॅनिंगबाबत परफेक्ट असलेला नेपोलियन म्हणतो, **'मी कोणतेही युद्ध प्रथम घरी कागदावर जिंकतो, मग रणांगणावर जिंकतो.'** याचा अर्थ माणूस अगोदर मनामध्ये जिंकतो व त्यानंतर तो प्रत्यक्ष जिंकतो. लेखकांनी एकूण सोळा प्रकरणांतून प्रकाश टाकला आहे. **'स्पर्धा परीक्षांचे अभ्यासतंत्र'** या पुस्तकात आजवर कोठेही वाचनात न आलेली माहिती वाचायला मिळते, राज्यसेवेतील विविध सेवा व पदांची संपूर्ण माहिती पुस्तकात आहे. अभ्यासाची नेमकी सुरवात कशी करावी, मार्गदर्शक, कोचिंग क्लास, संदर्भ पुस्तके निवडण्याचे निकष काय असावेत, या विषयी सविस्तर चर्चा केली आहे. पूर्वपरीक्षा व मुख्य परीक्षेच्या प्रत्येक घटक विषयावर अभ्यासाची रणनीती, संदर्भ पुस्तकांची यादी वेगवेगळ्या प्रकरणांतून दिली आहे. वेळेचे व्यवस्थापन, वाचनाचे तंत्र, अभ्यासतंत्र व मुलाखतीचे मार्गदर्शन आहे.

राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचे अनिश्चित वेळापत्रक, परीक्षेमध्ये होणा-या गैरप्रकारांविषयी शंका-कुशंका यामुळे पालकांची व विद्यार्थ्यांची निरिच्छावृत्ती या पुस्तकामुळे दूर व्हावी. अवास्तव गैरसमज व न्यूनगंड दूर व्हावेत यासाठी नाईकवाडे आणि शहा यांनी वेगळी प्रकरणे देऊन प्रशासकीय सेवा हा करिअरचा उत्तम पर्याय

असण्यावर जोर दिला आहे. योग्य मार्गदर्शन व मार्गदर्शकाची निवड या प्रकरणात शालेय जीवनापासूनच स्पर्धा परीक्षांची तयारी करू इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचे धडे दिलेले आहेत. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना प्रत्येक विद्यार्थ्यास चांगले काय, दर्जात्मक काय हे समजलेले असते. कारण स्पर्धा परीक्षेची तयारी हीच एक विशिष्ट जीवनपद्धती आहे. त्या जीवनपद्धतीची सवय लागली, की विद्यार्थी शिस्तबद्ध होतो, फोकस्ड होतो. कमीत कमी शब्दांत कोणत्याही विषयाची मांडणी करायला शिकतो. कमी शब्दांमध्ये जास्त मुद्दे मांडण्याची आपल्याला सवय लागते. नाहीतर आपण शाळेत असताना सर्व उत्तरे जास्तीत जास्त शब्द वाढवून ओळी भरण्यासाठी लिहिलेली असतात. मला वाटते शाळा व महाविद्यालयातील शिक्षकांनी आता मुलांना अधिक अचूक लेखन करण्याकडे वळविले पाहिजे. स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी होण्याचा आणखी एक सोपा मार्ग म्हणजे सर्वांनी मिळून एकत्र अभ्यास करणे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे विद्यार्थी गटचर्चेमुळे मुलाखतीमध्ये सातत्याने पुढे असतात व निबंध लेखनातसुद्धा पुढे असतात. कारण एका विद्यार्थ्याने वाचलेल्या 4 मुद्द्यांपेक्षा सर्वांनी मिळून एकत्र वाचलेले 20 मुद्दे जर एकाच वेळी लिहिता आले तर जास्त गुण मिळू शकतात. शिवाय वेगवेगळे मतप्रवाह समजण्यास मदत होते. मुलाखतीत मुख्यत: आपल्या बायोडाटाच्या आधारे विद्यार्थ्यांबद्दल तसेच गाव, तालुका, जिल्हा, विषयांची आवड, छंद यासंबंधी प्रश्न विचारले जातात. कोणत्याच मुलाखतीमधील प्रश्न हे अचानक विचारलेले व गैरलागू प्रश्न नसतात. कुठेना कुठे तरी त्या विद्यार्थ्याच्या जगण्याशी संबंधित प्रश्न विचारले जातात. स्पर्धा परीक्षाविषयक पुस्तकात बहुतेकदा अभ्यासतंत्र दिलेले असते. पण प्रेरणेचा मंत्र न जपल्याने उपयुक्तता मर्यादित राहते. लेखक संजय मोरे यांच्या लेखनात नेमके हेच वेगळेपण आहे. त्यांच्या लेखनात अभ्यासाचे तंत्र व प्रेरणेचा मंत्र जपला गेल्याने **'स्पर्धा परीक्षांचे अभ्यासतंत्र'** या पुस्तकाची उपयुक्तता तर वाढतेच आणि मुलांवरील प्रभावसुद्धा टिकून राहील.

- पुस्तक - **स्पर्धा परीक्षांचे अभ्यासतंत्र**
- लेखक - **संजय मोरे**
- प्रकाशक - **डॉ. सुनील पाटील**
- प्रकाशन - **कवितासागर प्रकाशन, जयसिंगपूर**
- मूल्य - ८०/-
- संपर्क - ०२३२२ २२५५००, ९९७५८७३५६९